मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १७९ ■ रविवार, ०८ मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# ‘इराणवर सर्वात मोठा हल्ला होऊ शकतो’, डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमकीने मोठी खळबळ



**दैनिक युवक आधार**

अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील युद्ध आणखी भडकण्याची चिन्ह निर्माण झाली आहेत. अमेरिका-इस्रायलने संयुक्तपणे इराणवर केलेल्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा मृत्यू झाला. त्यानंतर इराणनेही अमेरिका-इस्रायलला जोरदार प्रत्युत्तर दिलं. तसेच इराणने काही आखाती देशांवर केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आज इराणच्या अध्यक्षांनी आखाती राष्ट्रांची माफी देखील मागितली. मात्र, त्यानंतरही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला पुन्हा धमकी दिल्यामुळे जगात खळबळ उडाली आहे.

‘आज इराणवर आणखी मोठा हल्ला केला जाऊ शकतो’, असं वक्तव्य डोनाल्ड ट्रम्प यांनी केलं आहे. याबाबत ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर पोस्ट करत इराणवर पुन्हा एकदा जोरदार टीका केली आहे. दरम्यान, ट्रम्प यांच्या या धमकीमुळे अमेरिका-इस्रायल आणि इराणमधील हे युद्ध आणखी भडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**डोनाल्ड ट्रम्प यांनी काय म्हटलं?**

“इराणने मध्यपूर्वेतील शेजारी राष्ट्रांची माफी मागितली आणि शरणागती पत्करली आहे. तसंच इराणने वचन दिलं की ते आता त्यांच्यावर (आखाती देशांवर) गोळीबार करणार नाहीत. इराणने हे आश्वासन फक्त आणि फक्त अमेरिका, इस्रायलच्या हल्ल्यामुळेच दिलं. अन्यथा ते मध्यपूर्वेवर ताबा मिळवून राज्य करू इच्छित होते. मागच्या हजारो वर्षांत पहिल्यांदा इराणला त्याच्या शेजारील मध्य पूर्वेकडील देशांकडून पराभव पत्करावा लागला. त्यामुळे मध्य पूर्वेकडील काही राष्ट्रांनी मला ‘धन्यवाद अध्यक्षही म्हटलं”, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

**डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला काय धमकी दिली?**

“इराण आता मध्य पूर्वेचा दादा राहिलेला नाही तर मध्य पूर्वेतील पराभूत राष्ट्र बनलं आहे, तसेच इराण शरण येईपर्यंत अनेक दशकं असंच पराभूत राष्ट्र राहील किंवा पूर्णपणे कोसळेल. मात्र, आज इराणवर मोठा हल्ला होऊ शकतो. इराणच्या वाईट वर्तनामुळे ज्या क्षेत्रांना आणि लोकसंख्येला आतापर्यंत लक्ष्य मानलं जात नव्हतं, त्यांनाही धोका निर्माण झाला आहे”, असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं.

इराणने शेजारी असलेल्या मुस्लीम राष्ट्रांची माफी मागत क्षेपणास्त्र हल्ले थांबवत असल्याची घोषणा केली. इराणचे अध्यक्ष डॉ. मसूद पेझेश्कियान यांनी म्हटलं की, इराणच्या तात्पुरत्या नेतृत्व परिषदेने शेजारील देशांवरील हल्ले आणि क्षेपणास्त्र प्रक्षेपण थांबविण्याचा निर्णय घेतला. जोपर्यंत इतर देशातून हल्ले होणार नाहीत, तोपर्यंत इराणही हल्ले करणार नाही. पेझेश्कियान म्हणाले, “मी शेजारच्या देशांची माफी मागतो. इतर देशांवर आक्रमण करण्याचा आमचा कोणताही हेतू नव्हता. तथापि अमेरिका आणि इस्रायलसमोर शरणागती पत्करणार नाही, असेही पेझेश्कियान यांनी स्पष्ट केले.

“इराणने बिनशर्त शरणागती पत्करावी, अशी इच्छा शत्रूंनी व्यक्त केली. त्यांची इच्छा त्यांच्याबरोबरच त्यांच्या थडग्यात पुरली जाईल”, असेही पेझेश्कियान म्हणाले.

## नागपूर मध्ये १० ते २३ मार्च रोजी राज्यस्तरीय "महालक्ष्मी सरस विक्री प्रदर्शन २०२६" चे आयोजन – ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू /संपादक नागपूर विभाग** : नागपूर येथे राज्यस्तरीय “महालक्ष्मी सरस २०२६” वस्तू व विक्री प्रदर्शनाचे आयोजन दि. १० ते २३ मार्च २०२६ दरम्यान रेशीमबाग मैदान, नागपूर येथे करण्यात आले आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी नागपूरकरांनी आणि परिसरातील नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देवून विविध उत्पादनांची खरेदी, सर्व प्रकारच्या खाद्यसंकृतीचा आस्वाद आणि नामवंत सांस्कृतिक कलाकारांचा कलेचा आनंद घ्यावा असे आवाहन मंत्री जयकुमार गोरे यांनी केले आहे.

महालक्ष्मी सरस मध्ये एकूण ३७० स्टॉल असतील यामध्ये १०० खाद्यपदार्थांचे व २७० इतर स्टॉल्स असतील अशी माहिती ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली. मंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता समुहांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी या करीता राज्यस्तरावर, विभागस्तरावर आणि जिल्हास्तरावर प्रदर्शनींचे आयोजन करण्यात येते. सन २००४ पासून ग्राम विकास विभागातंर्गत मुंबई येथे महालक्ष्मी सरस प्रदर्शना चे आयोजन करण्यात येते. देश पातळीवर प्रत्येक राज्यात विक्री व प्रदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे बोलतांना ते म्हणाले की, राज्यातील ग्रामीण भागातील महिला आर्थिक व सामाजिक दृष्ट्या स्वयंपूर्ण होण्याकरीता सन २०११ पासून ग्राम विकास विभागातंर्गत विविध उपक्रम राबविले जात आहेत. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची ३४ जिल्ह्यातील ३५१ तालूक्यांमध्ये अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून स्वयं सहाय्यता समुहातील महिलांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात येत असून त्यांना यशस्वी उद्योजिका म्हणून नवीन ओळख निर्माण करण्याची संधी निर्माण देण्यात येत आहे. अभियानातंर्गत ३ लाख पेक्षा जास्त महिला उद्योजिका राज्यभरात निर्माण केल्या आहेत असे ते म्हणाले.

ग्रामीण भागातील महिला या पारंपारिक व अपारंपारिक अशा शेती आधारीत व बिगर शेती आधारीत व्यवसायाशी जोडल्या गेलेल्या आहेत. अभियानातील बहुतांशी महिलांनी यशस्वी उद्योजिका म्हणून स्वतःचे स्थान निर्माण केलेले आहे व विविध उत्पादनांची निर्मीती करत लखपती दीदी होण्याचा बहुमान मिळवत आहेत.महालक्ष्मी सरस प्रदर्शनीचा मुख्य उद्देश देशातील व राज्यातील स्वयं सहाय्यता समुहांतील महिलांनी व ग्रामीण कारागिरांनी तयार केलेल्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलव्ध करुन देणे हा आहे. याचबरोबर समुहांतील सदस्यांना विविध राज्यातील उत्पादने, विक्री व बाजारपेठेची माहिती देणे व राज्या- राज्यातील लोकांचे राहणीमान, खाद्यसंस्कृती व कलाकुसर इ. चा परस्परांना परिचय करुन देणे असा उद्देश आहे.

## धाडसाला वयाचे बंधन नाही ६ वर्षीय मानसने समुद्र लिलया पोहून रचला इतिहास ; जागतिक विक्रमाची नोंद !

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** उरण चा अवघ्या ६वर्षाचा जलतरणपटू मानस पाटील यांनी समुद्रात १७ किलोमीटर अंतर यशस्वीरित्या पोहून पूर्ण करण्याच्या नवीन जागतिक विक्रमाला गवसणी घातली आहे. नागाव बीच उरण येथून सुरू झालेला हा प्रवास त्यांनी जे एन पी ए बंदरापर्यंत पहिल्याच प्रयत्नात यशस्वीरित्या पूर्ण केला. मानसने हे १७ किलोमीटरचे आव्हानात्मक अंतर केवळ ४ तास ५०मिनिटात पार केले .या कामगिरीमुळे तो "वल्डस यंगेस्ट स्विमर टू कम्प्लीट १७ किलोमीटर ओपन सी स्विम" ठरला आहे. त्याच्या या अतुलनीय कामगिरीची दखल घेऊन आय इ ए बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने या विक्रमाला अधिकृत मान्यता दिली आहे. आय इ ए बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड सीईओ डॉ.संदीप सिंह यांनी मानसचे कौतुक करताना म्हटले की मानसने,"इतक्या लहान वयात जे



साध्य केले ते खरोखर प्रेरणादायक आहे, नॅशनल जुरी हेमंत सिंह आणि मीडिया हेड अरुणलाल यांनीही मानसच्या या कामगिरीने भारताच्या जलतरण क्षेत्रात नवा अध्याय जोडला गेल्याचे नमूद केले.

मानसच्या यशामागे त्याचे प्रशिक्षक संतोष पाटील, सुनील पाटील आणि निरीक्षक सुनील मयेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले .तसेच त्याच्या आईवडिल आणि संपूर्ण परिवाराचा खंबीर पाठिंबा त्याला मिळाला. मानसच्या आईने व्यक्त केले की, मानसने आमच्या अपेक्षा उंचावल्या असून त्याच्या या यशाचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. आपल्या यशाबद्दल बोलताना चिमुकला मानस म्हणाला, "मला भविष्यात अजून अनेक विक्रम करायचे आहेत ,आणि माझ्या देशाचे नाव जगभरात उंचवायचे आहे ,"मानस च्या या जिद्दीमुळे संपूर्ण रायगड जिल्ह्यातून त्याच्यावर अभिनंदनचा वर्षा होत आहे. वयाच्या ६व्या वर्षी मुले खेळण्यात दंग असतात, त्याच वयात मानसने अथांग समुद्राच्या लाटांची झुंज देत भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे .मानसच्या या ऐतिहासिक कामगिरीने हे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की मनात जिद्द असेल आणि पाठीवर आई-वडिलांचा आशीर्वादाचा हात असेल तर कोणतेही अथांग अंतर पार करणे अशक्य नाही, त्याची ही झेप केवळ एका विक्रमापूर्ती मर्यादित नसून देशातील कोट्यावधी तरुणांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.




## अमृत महोत्सवी वर्षनिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनप्रवासाची प्रेरणादायी चित्रफीत सादर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा जीवन प्रवास कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजने वार्षिक स्नेहसंमेलनात गाण्यांच्या आणि नाटिकेच्या माध्यमातून ‘कर्मयोगी एक अखंड प्रवास’ या शिर्षकाखाली सादर केला होता. त्याचे पुनश्च सादरीकरण चित्रफितीच्या माध्यमातून करण्यात आले. या चित्रफितीतून कुटुंबवत्सल, समाजाभिमुख आणि कार्यकर्त्यांशी घट्ट नातं जपणारा लोकनेता म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे व्यक्तिमत्त्व सर्वांसमोर प्रभावीपणे उभे राहिले. कार्यक्रमातील सादरीकरण पाहून उपस्थित मान्यवर आणि प्रेक्षक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले.



उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये झालेल्या या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, व्हाईस चेअरमन भगीरथ शिंदे, सचिव विकास देशमुख, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज कामोठेचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक परेश ठाकूर, संस्थेचे सहसचिव डॉ. राजेंद्र मोरे, डॉ. शिवलिंग मेनकुदळे, बंडू पवार, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य डी.बी.पाटील, ज्योत्स्ना ठाकूर, जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, लाईफ मेंबर रवींद्र भोईर, नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य निकिता खारकर, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य ॲड. राहुल घरत, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, धीरज ओवळेकर, धैर्यशील माने, प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे आदी उपस्थित होते.

## वानोळा येथे छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**माहूर प्रतिनिधी/सय्यद ईसा** : माहूर तालुक्यातील तीन महसूल मंडळापैकी एक असलेल्या वानोळा महसूल मंडळामध्ये छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान अंतर्गत समाधान शिबिराचे आयोजन तहसील कार्यालयामार्फत करण्यात आले होते कार्यक्रमाचे अध्यक्ष वानोळा गावचे सरपंच सुनीता शिडाम हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून माजी सरपंच संतराम राठोड, माजी उपसरपंच सुरेश राठोड,उपसरपंच अभिजीत राठोड, कृष्णकुमार राठोड तर प्रशासनाचे माहूर तहसीलचे प्रभारी तहसीलदार जेठे, नायब तहसीलदार श्रीमती सूर्यवंशी, श्रोते, पुरवठा विभागाचे निरीक्षक निलेश राऊत,भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक वर्षा गंबरे,दुय्यम निबंधक लता तलांडे, महावितरणचे उपअभियंता शेंडे, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे सहायक मॅनेजर कुंभरे,स्टेट बँक



ऑफ इंडिया बँकेचे अधिकारी लक्ष्मण जंकटे,पशुवैद्यकीय अधिकारी राजगुरू, आरोग्य विभागाचे तालुका सुपरवायझर गजभारे,वैद्यकीय अधिकारी डॉक्टर भुसारे, कृषी विभागाचे उपकृषी अधिकारी सूर्यवंशी, मंडळ कृषी अधिकारी अमित पवार, कृषी सहाय्यक अधिकारी साबळे, शेवाळकर,प्रवीण शिंदे, वानोळा मंडळ अधिकारी चंदनकर, तलाठी अभिजीत कुडमेते, पेंटेवाड,तवर,ग्रामसेवक कासदेकर, पत्रकार पंडित धुप्पे,सुदाम चव्हाण, सुभाष आमटे, राजेश राठोड यांचे सह परिसरातील सरपंच उपसरपंच निराधार,अपंग लाभार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते या वेळी अनेक गरजू लोकांना प्रमाणपत्र, सातबारा व इतर प्रमाणपत्र वाटप करण्यात आले अनेक समस्याचे लेखी निवेदन घेऊन संबंधित विभागाकडे वर्ग करण्यात आले यावेळी सूत्रसंचालन पंडित धुप्पे यांनी केले तर आभार अभिजीत राठोड यांनी मांनले.

## महाराष्ट्राचा राष्ट्रीय शास्त्रंग मार्शल आर्ट्स स्पर्धेत दिमाखदार प्रथम क्रमांक

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर/मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख** : दि. 28 ते 30 जानेवारी 2026 दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथील रामचंद्र हॉल येथे पार पडलेल्या 5th National Level Sub Junior, Junior, Senior Shastrang Martial Art Championship 2025-26 या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत महाराष्ट्र राज्याने उत्कृष्ट आणि दिमाखदार कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत देशातील विविध राज्यांमधील सुमारे 300 हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. हरियाणा, पंजाब, दिल्ली, हिमाचल प्रदेश, चंदीगड आणि महाराष्ट्र या राज्यांतील खेळाडूंमध्ये चुरशीच्या लढती रंगल्या.

स्पर्धेचे नियोजन राज्य संघटनेचे सचिव श्री. मिलिंद काटमोरे तसेच राष्ट्रीय संघटनेचे सचिव ग्रँडमास्टर श्री. विक्रम थापा यांच्या मार्गदर्शनाखाली




उत्कृष्टरीत्या करण्यात आले. स्पर्धेची संपूर्ण व्यवस्था, पंचांचे नियोजन, खेळाडूंसाठी आवश्यक सुविधा आणि शिस्तबद्ध आयोजन यामुळे कार्यक्रम यशस्वी ठरला.

मुंबई उपनगरातील मंगेश शिर्के, पशुपती ठाकूर, गौरांग ठाकूर, नव्या करंजेकर, अपूर्वा मोहिते, आराध्य कानडे, आलिया अगलावे, अथर्व अनावकर, रीतवी टेलर, क्रीषेल पिंटो, सानिका चव्हाण, आराध्या वालावलकर, निकोलस मकवास, मैत्री महाडीक, वंशिका कदम, रुद्र बनसोडे, श्रेयश गिरमे, हर्षाली राठोड, नियांशु पेठे, भव्या मोहिते, स्वरा ननावरे, नैतिक बगालिया, मिनाक्षी राऊत, सार्थक धुले, सार्थक भरडावा, अथर्व भुवड आणि तन्मय मालुष्टे या खेळाडूंनी उत्कृष्ट कौशल्य, शिस्त आणि मेहनतीच्या जोरावर महाराष्ट्राला एकूण 26 सुवर्णपदके, 15 रौप्यपदके आणि 7 कांस्यपदके मिळवून दिली. या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाराष्ट्राने गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावत विजेतेपद पटकावले.

मुंबई जिल्ह्याचे अध्यक्ष श्री. पशुपती ठाकूर, सचिव श्री. मंगेश शिर्के तसेच प्रशिक्षक श्री. गौरांग ठाकूर, श्री. अखिलेश राणे, श्री. हर्ष राणे आणि अपूर्वा मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी कठोर सराव करून हे यश मिळवले. खेळाडूंच्या सातत्यपूर्ण सराव, जिद्द आणि संघभावनेमुळे हे यश शक्य झाल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व विजेते खेळाडू, प्रशिक्षक आणि आयोजकांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. तसेच दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे अध्यक्ष श्री. अजित म्हामुणकर यांनी महाराष्ट्र मार्शल आर्ट्स संघाचे तसेच खेळाडूंचे विशेष अभिनंदन केले. त्यांनी महाराष्ट्र राज्य मार्शल आर्ट्स संघ, तसेच पशुपती ठाकूर आणि गौरांग ठाकूर यांच्या कार्याचेही कौतुक करत भविष्यात अशाच यशाची अपेक्षा व्यक्त केली.

महाराष्ट्राच्या या यशामुळे राज्याच्या क्रीडा क्षेत्राचा नावलौकिक आणखी उंचावला असल्याची भावना क्रीडाप्रेमींनी व्यक्त केली.

## भारज बुद्रुक गावावर तीव्र पाणीटंचाईचे सावट ! ग्रामपंचायत कडून पाणी टँकरचा प्रस्ताव दाखल

**दैनिक युवक आधार**

**वरूड सर्कल प्रतिनिधी/ज्ञानेश्वर कुंनिकाळजे** : जाफराबाद तालुक्यातील मौजे भारज बुद्रुक येथे तीव्र पाणीटंचाई उद्भवले असून येथील लघु पाझर तलाव आटल्याने गावावर पिण्याची पाण्याची समस्या उद्भवली असून आता नागरिकांना विहिरीवरून किंवा खाजगी टँकरने पाणी घ्यावे लागत आहे यंदा प्रथमच 2012 नंतर मोठी पाणी समस्या उद्भवली खरे तर पिण्याचे पाणी धरण क्षेत्रामध्ये राखीव ठेवण्यात येते मात्र कमी झालेल्या पावसाचा परिणाम व बाष्पक भावनांचे परिणाम यामुळे धरण यंदा लवकरच आटले असून त्यामुळे पाणी समस्या निर्माण झाले आहे खरे तर यंदा प्रथमच जल जीवन मिशन अंतर्गत अडीच लाख लिटर एवढे मोठे भव्य असे जलकुंभ उभारले गेले गावांतर्गत पाईप लाईन असे मोठे काम झाले मात्र धरणातच पाणी नसल्याने एवढी मोठी योजना होऊनही पाण्यासाठी राणवन भटकण्याची वेळ का यावी असा एक प्रश्न सध्यातरी उभा राहिला आहे या संदर्भात ग्राम विकास अधिकारी श्री पठाण यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी पाणीटंचाईची कबुली



दिली आहे मात्र यावर आम्ही वरिष्ठ पातळीवर पाणी टँकर साठी प्रस्ताव दाखल केले असून आठवडाभरामध्ये पाणी टँकरला मंजुरी मिळेल अशी आशा त्यांना आहे गावासाठी इतर पाणीपुरवठ्याच्या विहिरी मधून फक्त 11 हजार लिटर दरडोई पाणी उपलब्ध होऊ लागले असून दिवसाकाठी भारज गावाला एक लाख 44 हजार लिटर पाण्याची आवश्यकता आहे त्यामुळे सध्या तरी पाणी टंचाई आहे मात्र आठवडाभर यानंतर प्रशासनाकडून तीन टँकर उपलब्ध होईल त्या एका टँकरमध्ये 24 हजार लिटर पाण्याची क्षमता त्याच्या तीन फेरी गावात होतील त्यामुळे सध्या तरी भारज गावाची पिण्याची पाण्याची समस्या अजून तरी तीन महिने टँकरवर अवलंबून असणार हे मात्र निश्चित झाले आहे त्यामुळे भारज करांना आपल्या पाणी वापराची काटकसर करण्याची सवय आतापासूनच लावावी लागणार असून शेतातील विहिरीची पाणी पातळी जोत्याखाली गेली असून तेही उपलब्ध होणे अवघडच आहे आगामी काळात पाण्याची योग्य नियोजन करणे काळाची गरज बनली आहे

## चिर्ले गावात धुळवडीत रंगला पैशाने तुटली नाती, नाट्यप्रयोग

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : उरण तालुक्यातील चिर्ले येथील श्रीराम मंदिराच्या प्रांगणात धुलीवंदनाचे औचित्य साधून, येथील तरुणाईच्या पुढाकाराने अष्टगंध कलामंच निर्मित पैशाने तुटली नाती हा सामाजिक नाट्यप्रयोग ) रात्री सादर करण्यात आला. या नाट्यप्रयोगाला रसिक प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला. हा नाट्यप्रयोग पाहण्यासाठी आलेल्या महिला वर्गाची उपस्थिती नजरेत भरणारी होती. नाटकाचे लेखन हासूराम पाटील तर दिग्दर्शन धनेश्वर म्हात्रे यांनी केले आहे.

जमिनीच्या पैशांमुळे कुटुंबातील माणसा-माणसांमध्ये अंतर पडू लागले आहे. भावा- बहिणींची रक्ताची नाती तुटत चालली आहेत. ही नाती कायम टिकून राहावी, यातून सामाजिक एकोपा टिकून राहावा, अर्थात कुटुंबासह समाजाचा स्वाभिमान जागविणाऱ्या या सच्चा समाजभक्त हसूराम पाटील या लेखकाची तळमळ प्रशसनीय आहे. हे या नाटकाच्या



सादरीकरणातून दिसून येत आहे. या नाट्य प्रयोगाचे उद्घाटन पत्रकार दत्तात्रेय म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते बळीराम घरत, अध्यक्ष अशोक म्हात्रे, लेखक हासुराम पाटील, दिग्दर्शक धनेश्वर म्हात्रे, जीवन डाकी, मनोहर, यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.

या नाट्यप्रयोगासाठी प्रज्योत पाटील, जयकिसन मोकल अनमोल कोळी प्रवीण सर या पडद्यामागील कलाकारांनी विशेष मेहनत घेतली. चिर्ले गावात कित्येक वर्षानंतर यावर्षी या वास्तववादी नाट्यकलाकृतीचा रसिकांनाआनंद लुटायला मिळाला. अत्यंत कौटुंबिक जिव्हाळ्याच्या रक्ताच्या नातेसंबंधातील वास्तवातील या नाटकात जमिनीच्या प्लॉटच्या पैशांमुळे कशी रक्ताची नाती तुटताहेत हा खराखुरा देखावा या नाटकातून लोकांच्या जनजागृतीसाठी लेखकाने वास्तवात उभा केला आहे. यात अष्टगंध कला मंचाच्या कलाकारांनी आपल्या अभिनयाचे रंग भरत या संधीचे सोने केले आहे.

नाटकात हसुराम पाटील , सुमित कुंभार, अशोक म्हात्रे, कृष्णकांत म्हात्रे, वैशाली मोहिते, परीशा सरोदे ,निकिता म्हात्रे, प्रफुल्ला चव्हाण, चेतन पाटील, रोशन घरत,दिगंबर कोळी, नवनीत माळी, अलंकार कडू, अनमोल कोळी आदी कलाकारांनी नाटकातील प्रसंग आणि सादरीकरणातून नाटकाची उंची वाढविली आहे. राजेश चव्हाण यांची रंगभूषा उठावदार होती. आनंद कुबल यांचे संगीत मनाला भावले. ध्वनी संकलन व्यवस्था उत्तम होती. नेपथ्य राजा जोशी यांचे होते. या सर्व तंत्रज्ञांनी व कलाकारांनी नाटकातील प्रत्येक प्रसंग फुलविला आहे.

## राजेंद्रजी लहाने यांची नगरपालिकेकडे धडक तक्रार!

### डिव्हायडरवरील अनधिकृत बॅनर हटवा; अपघातांचा धोका वाढल्याचा गंभीर आरोप

**दैनिक युवक आधार**

**रंगनाथ सावळे /चिखली तालुका ग्रामीण प्रतिनिधी** : चिखली शहरातील मुख्य रस्त्यांवरील डिव्हायडरवर अनधिकृतपणे लावण्यात येणाऱ्या बॅनरप्रकरणी माहिती अधिकार कार्यकर्ते श्री राजेंद्रजी सर्जेराव लहाने माहिती अधिकार प्रचारक बुलढाणा यांनी नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करत तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

शहरातील विविध राजकीय पक्ष, सामाजिक कार्यकर्ते तसेच काही नागरिकांकडून डिव्हायडरवर मोठमोठे



बॅनर लावले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यापैकी अनेक बॅनर प्रशासनाच्या परवानगीशिवाय उभारले जात असून नियमांचे उल्लंघन होत असल्याचे तक्रारीत नमूद आहे.

विशेषतः वळणाच्या ठिकाणी आणि चौकांमध्ये लावलेले बॅनर वाहनचालकांसाठी धोकादायक ठरत आहेत. समोरून येणारी वाहने किंवा पादचारी दिसत नसल्याने अपघाताची शक्यता वाढली आहे. नागरिकांनीही या प्रकाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

तक्रारीत असेही नमूद करण्यात आले आहे की, काही बॅनर नगरपालिका प्रशासनाच्या परवानगीने लावले जात असले तरी अनेक ठिकाणी अनधिकृत फलकांमुळे वाहतुकीत अडथळे निर्माण होत आहेत.

**प्रशासनाला ठोस कारवाईचे आवाहन**

तक्रारदार राजेंद्रजी लहाने माहिती अधिकार प्रचारक बुलढाणा यांनी मागणी केली आहे की –

१)सर्व अनधिकृत बॅनर त्वरित हटवण्यात यावेत.

२)भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर नियम लागू करावेत.

३)जबाबदारांवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

या तक्रारीनंतर नगरपालिका प्रशासन काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून ठोस निर्णयाची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## हुतात्मा स्मारक परिसरातील अतिक्रमण व झाडतोड प्रकरणी ९ मार्चपासून आमरण उपोषणाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**अर्धापूर (प्रतिनिधी अरविंद पांचाळ)** : दि.८ अर्धापूर तालुक्यातील पाटनूर येथे असलेल्या ऐतिहासिक हुतात्मा स्मारकाच्या जमिनीवर मनरेगा योजनेतून लावलेली सागवान व इतर झाडे तोडून ग्रामपंचायत प्रशासनाने बेकायदेशीर अतिक्रमण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी तात्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अन्यथा ९ मार्च २०२६ पासून तहसील कार्यालय व पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा युवा पँथरचे जिल्हाध्यक्ष दिनेश लोणे पाटनुरकर यांनी दिला आहे.

याबाबत त्यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती अर्धापूर यांच्यासह जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पोलिस अधीक्षक व तहसीलदार यांना निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत हुतात्मा स्मारक परिसरात लाखो रुपये खर्च करून लावलेली सागवान व इतर झाडे कोणतीही परवानगी न घेता तोडण्यात आली आहेत. तसेच त्या ठिकाणी ग्रामपंचायत कार्यालयाच्या बांधकामासाठी अतिक्रमण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. महाराष्ट्र झाडतोड प्रतिबंधक कायद्यानुसार मौल्यवान झाडे तोडण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक असते. मात्र या प्रकरणात अशी कोणतीही परवानगी घेण्यात आलेली नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे मनरेगा निधीच्या वापराची चौकशी करून दोषी ग्रामपंचायत प्रशासनावर मनरेगा नियम, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा व पर्यावरण कायद्यांनुसार कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## नागाव येथे पीएनपी सायरस पुनावाला सीबीएसई शाळा समितीची भव्य निवड ; ग्रामीण शिक्षणाला नवोदय

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : रायगड जिल्ह्यातील , अलिबाग तालुक्यातील नागाव गावात पीएनपी सायरस पुनावाला सीबीएसई इंग्लिश मीडियम स्कूलच्या शाळा समितीच्या पदाधिकाऱ्यांसह सदस्यांची निवड गुरुवारी (५ मार्च) उत्साहात पार पडली. पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभाने ग्रामीण भागातील शिक्षण क्रांतीची दिशा स्पष्ट केली. नवनिर्वाचित सदस्यांना चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे देण्यात आली असून, पुष्पगुच्छाने सन्मानित करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.विविध क्षेत्रातील निवडशाळा समितीच्या सदस्यपदासाठी व्यक्तिमत्वातील सकारात्मकता, सामाजिक बांधिलकी व शैक्षणिक क्षेत्रातील तळमळ यांचा आधार घेऊन दहा मान्यवरांची निवड करण्यात आली. यात कृषीवल दैनिकाच्या संपादक माधवी सावंत, राजकीय-सामाजिक-शिक्षण-क्रीडा क्षेत्रातील अंजली मोरे, नागावचे माजी सरपंच निखील मयेकर, राकेश म्हात्रे, निलेश खोत, राहूल गणपत, अमित फुंडे, शरयू अधिकारी, अभिजीत वाळंज व रंजित राऊत यांचा समावेश आहे. रेवदंडा-चौल परिसरातील निलेश खोत हे कधीही प्रसंगी धावणारे सामाजिक कार्यकर्ते म्हणून प्रसिद्ध असून, गोरगरिबांसाठी रात्री-अपरात्री मदत करणारे म्हणून त्यांची ओळख आहे. ही निवड शाळेच्या विविध पैलूंना बळकटी देणारी ठरेल.संस्थेची पार्श्वभूमी व विस्तार पीएनपी एज्युकेशन सोसायटी ही शेकाप नेते व संस्थेचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी कोकणाचे भाग्यविधाते व रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष स्व. प्रभाकर पाटील यांच्या स्मृतीनिमित्त स्थापन केली. ग्रामीण खेडे-पाड्यातील मुला-मुलींना दर्जेदार इंग्रजी शिक्षण मिळावे यासाठी नागाव येथे सीबीएसई बोर्डाची अद्ययावत शाळा सुरू करण्यात आली. संस्थेच्या माध्यमातून शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळत असून, जिल्हाभर साडेसात हजारहून




अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. स्व. फुलगांवकर यांचे मोलाचे योगदान संस्थेच्या विस्तारात महत्त्वाचे ठरले.

**"चित्रलेखा पाटील यांचे प्रतिपादन"**

कार्यक्रमात बोलताना चित्रलेखा पाटील म्हणाल्या, "ग्रामीण भागातील मुलांना चांगले शिक्षण मिळावे हीच संस्थेची ध्येयधोरण आहे. या शाळेत शिक्षक विद्यार्थ्यांना उत्तम पद्धतीने शिकवित असून, विविध क्षेत्रातील सदस्यांच्या सहभागाने शाळेचा सर्वांगीण विकास होईल. ही निवड खऱ्या अर्थाने आनंददायी आहे." त्यांनी समितीच्या सदस्यांच्या योगदानाबाबत विश्वास व्यक्त केला.उपस्थिती व वातावरण

समारंभात पीएनपी एज्युकेशन सोसायटीचे कार्यालयीन मार्गदर्शक गबाजी गीते, कॉलेज संचालक विक्रांत वार्डे, लेखापाल अंकित भानुशाली, अकॅडमिक डायरेक्टर राजश्री पाटील, प्रा. निशिकांत कोळसे, जनसंपर्क अधिकारी अमोल नाईक आदींसह शाळेतील प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी व स्थानिक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाने नागाव परिसरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, शाळेच्या भविष्याबाबत उत्साह वाढला आहे.

# लोकशाहीच्या विकासात निवडणूक प्रक्रिया महत्वपूर्ण -एमआयटीचे डॉ. परिमल माया सुधाकर यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी/नागपूर :** भारतीय लोकशाहीच्या विकासात निवडणूक प्रक्रिया महत्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट पुणे येथील डॉ. परिमल माया सुधाकर यांनी सांगितले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागाच्या ८० वर्षपूर्तीनिमित्त विशेष व्याख्यान शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६ रोजी पार पडले. यावेळी डॉ. परिमल बोलत होते.

माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विभाग प्रमुख डॉ. विकास जांभुळकर यांनी भूषविले, तर विशेष व्याख्याते म्हणून एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट पुणे येथील डॉ. परिमल माया सुधाकर, लोक प्रशासन विभाग प्रमुख डॉ. जितेंद्र वासनिक यांची विशेष उपस्थिती होती. 'भारतातील लोकशाहीचे स्वातंत्र्यानंतर निवडणुकीचे राजकारण' या विषयावर पुढे बोलताना डॉ. परिमल माया सुधाकर यांनी स्वातंत्र्यानंतर भारतातील लोकशाही व्यवस्थेचा विकास आणि निवडणूक राजकारणाची घडण यावर सखोल विवेचन केले. भारतासारख्या बहुभाषिक आणि बहुधार्मिक देशात लोकशाही टिकणे कठीण असल्याची शंका अनेक पाश्चिमात्य अभ्यासकांनी व्यक्त केली होती. मात्र, भारताने लोकशाही शासन पद्धतीचा यशस्वी स्वीकार करून जगासमोर एक आदर्श निर्माण केला, असे त्यांनी नमूद केले.

लोकशाही ही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसून ती सत्ताविभाजन, न्यायपालिकेचे स्वातंत्र्य, मूलभूत अधिकारांचे संरक्षण आणि कायद्याचे राज्य या तत्त्वांवर आधारित व्यापक व्यवस्था




असल्याचे डॉ. परीमल माया सुधाकर यांनी भारतीय संविधानाने सार्वत्रिक प्रौढ मताधिकार स्वीकारून प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार दिला. लोकशाहीच्या दृष्टीने हा क्रांतिकारी निर्णय असल्याचे त्यांनी सांगितले.

१९५१-५२ मधील पहिल्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की त्या काळात आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव असूनही भारतीय निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रिया प्रभावीपणे राबविली. गावोगावी मतदार नोंदणी, मतदान केंद्रांची उभारणी आणि मतदार जागृती ही मोठी प्रशासकीय कामगिरी होती.

भारतीय निवडणूक राजकारणाचा आढावा घेताना त्यांनी सांगितले की १९५२ ते १९८९ या कालखंडात एका प्रमुख पक्षाचे वर्चस्व होते, ज्याला "काँग्रेस सिस्टीम" असे संबोधले जाते. त्यानंतर प्रादेशिक पक्षांचा उदय, बहुपक्षीय स्पर्धा आणि आघाडी सरकारांची परंपरा यामुळे भारतीय राजकारण अधिक गतिमान झाले.

सध्याच्या राजकीय परिस्थितीचा संदर्भ देताना त्यांनी सांगितले की, केंद्रात सत्ताधारी पक्ष असला तरी अनेक राज्यांमध्ये विरोधी पक्षांची सरकारे आहेत. त्यामुळे भारतीय लोकशाहीमध्ये विविध राजकीय प्रवाहांचा समतोल कायम असल्याचे दिसून येते. २०१४ नंतर सांस्कृतिक राष्ट्रवादाचे मुद्दे केंद्रस्थानी आले असले तरी २०२४ च्या निवडणुकीत मतदारांनी संतुलित कौल दिल्याचे त्यांनी नमूद केले. भारतीय लोकशाहीपुढील आव्हानांचा उल्लेख करताना त्यांनी वाढती आर्थिक विषमता आणि निवडणूक प्रक्रियेतील पैशाचा प्रभाव याकडे लक्ष वेधले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ नोव्हेंबर १९४९ रोजी दिलेल्या इशाऱ्याचा उल्लेख करत त्यांनी सामाजिक व आर्थिक समतेचे महत्त्व अधोरेखित केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. विकास जांभूळकर यांनी भारतीय लोकशाहीच्या ७५ वर्षांच्या निवडणूक प्रवासाची कॅप्सूल फॉर्ममध्ये विद्यार्थांना उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ.परिमल माया सुधाकर यांचे आभार व्यक्क करून निवडणूक राजकारण आणि लोकशाही वर आपले अध्यक्षीय उद्बोधन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रमोद काणेकर यांनी केले, तर आभार प्रा. किशोर नैताम यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. किशोर पाटील, प्रा. प्रदनंद माटे, प्रा. सचिन चापके,प्रा. प्राची वासनिक, डॉ.रायन महाजन,प्रा. प्रियंका गावंडे, डॉ. अभिषेक चिमणकर तसेच विभागातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे सहकार्य लागेल.

# तहसीलचा कारभार 'मनमानी एक्सप्रेस'

## आश्वासन पेटवून आंदोलनकर्त्यांचा इशारा: 16 मार्चपासून आमरण उपोषण

**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र -राजु शिंदे :** भोकरदन तहसील कार्यालयात कायद्याला हरताळ फासून विभागीय आयुक्तांच्या परवानगीशिवाय कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्त्या केल्या जात असल्याचा स्फोटक आरोप सामाजिक कार्यकर्ते नारायण लोखंडे व विकास जाधव यांनी केला आहे.या बेकायदेशीर कारभारामुळे शेतकऱ्यांचे दुष्काळी व अतिवृष्टी अनुदान रखडले असून, प्रशासनाची संवेदनशून्यता उघडी पडली आहे.तहसील कार्यालयातील आस्थापना विभागात महसूल सहायक शरद घोडके व अन्य कर्मचारी गेल्या दोन वर्षांपासून मूळ पदस्थापना सोडून परस्पर प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत. विभागीय आयुक्तांच्या लेखी परवानगीशिवायच हे कर्मचारी कार्यरत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.म्हणजेच,शासन नियम कागदावर आणि प्रत्यक्षात 'मनमानी राज' अशी स्थिती निर्माण झाली आहे. या अन्यायकारक कारभाराविरोधात नारायण लोखंडे व विकास जाधव यांनी दोन महिन्यांपूर्वी तहसील कार्यालयासमोर पाच दिवस उपोषण केले होते. त्या वेळी तहसीलदार ज्ञानेश्वर काकडे यांनी "पंधरा दिवसांत प्रश्न मार्गी लावू" असे लेखी



आश्वासन दिले होते.मात्र दोन महिने उलटूनही कोणतीही कारवाई न झाल्याने हे आश्वासन हवेत विरल्याचे चित्र असून, प्रशासनाची शब्दालाच किंमत नसल्याचे स्पष्ट झाले आहे.वरिष्ठ अधिकारी अतिवृष्टी अनुदान घोटाळ्याप्रकरणी केवळ थातूरमातूर चौकशीचा फार्स करत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. प्रशासनाच्या या उदासीनतेचा निषेध म्हणून नारायण लोखंडे व विकास जाधव यांनी तहसीलसमोर तहसीलदारांच्या लेखी आश्वासनाची होळी करून संताप व्यक्त केला.यानंतर विभागीय आयुक्तांना दिलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की,वर्ग–३ व वर्ग–४ कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्त्या आयुक्तांच्या परवानगीशिवाय करता येत नाहीत.तरीही उपविभागीय अधिकारी कार्यालयात संजय सपकाळ,आव्हाड, श्रीमती देशपांडे व तहसील कार्यालयात महसूल सहायक शरद घोडके हे कर्मचारी बेकायदेशीरपणे कार्यरत आहेत.विशेष म्हणजे, 27 नोव्हेंबर 2024 रोजी जाफ्राबाद तहसीलदारांनी शरद घोडके यांना गैरहजर राहिल्याबद्दल कारवाईचा इशारा दिला होता.तरीही ते आजतागायत मूळ पदस्थापनेवर रुजू झालेले नाहीत. यामुळे वरिष्ठ आदेशांचा उघड अवमान आणि कामकाजात गंभीर अनियमितता झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.या कर्मचाऱ्यांवर कुणाचाही वचक नसल्याने सामान्य नागरिकांची लूट सुरू असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.वारंवार निवेदने, तक्रारी आणि दोन वेळा उपोषण करूनही फक्त लेखी आश्वासने मिळाली; प्रत्यक्ष कारवाई मात्र शून्यच असा तीव्र संताप आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला आहे. जर तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई झाली नाही,तर 16 मार्चपासून तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा थेट इशाराही देण्यात आला आहे.

**आंदोलनकर्त्यांनी ठाम मागणी**

सर्व बेकायदेशीर प्रतिनियुक्त्या तात्काळ रद्द कराव्यात

संबंधित कर्मचाऱ्यांना मूळ पदस्थापनेवर पाठवावे

दोषी अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी शेतकऱ्यांचे रखडलेले अनुदान त्वरित वितरित करावे

# भविष्यातील आयटी व्यावसायिकांना सक्षम बनविणे: अभिजीत महांकाळ

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग/अमरावती:** अमरावती येथील सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी एक विशेष करिअर आणि प्लेसमेंट-केंद्रित सत्र आयोजित करण्यात आले होते. सत्राचे मुख्य वक्ते टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) चे मुख्य तंत्रज्ञान आर्किटेक्ट अभिजीत ए. महांकाळ यांनी सिपना कॉलेजमधील विद्यार्थ्यांना संबोधित केले. आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) आणि ऑटोमेशन मुळे आयटी उद्योगात जलद परिवर्तन होत आहे हे लक्षात घेता महांकाळ यांनी विद्यार्थ्यांना प्लेसमेंटसाठी तयार राहण्याचे आणि उद्योगाशी संबंधित कौशल्ये आत्मसात करण्याचे महत्त्व यावरील मार्गदर्शन केले. त्यांनी आयटी करिअर रोडमॅप, मागणीनुसार तंत्रज्ञान आणि टीसीएस मुलाखती / भरती प्रक्रियेसाठी प्रभावीपणे तयारी करण्यासाठी मौल्यवान अंतर्दृष्टी दिली.

त्यांचा जीवन प्रवास शेअर करताना, त्यांनी विनम्र सुरुवातीपासून ते यूके, अमेरिका, भारत आणि जर्मनीमधील आंतरराष्ट्रीय क्लायंटसोबत काम



करण्यापर्यंतचे प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी चिकाटी, सतत शिक्षण, स्पष्ट ध्येय निश्चिती आणि वेळ व्यवस्थापनाचे महत्त्व यावर भर दिला. त्यांच्या प्रेरक अनुभवांनी विद्यार्थ्यांना खोलवर प्रेरणा दिल्यात आणि करिअर चे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी लक्ष केंद्रित आणि दृढनिश्चयी राहण्यास प्रोत्साहित केले. अभिजीत महांकाळ यांची जीवनकथा, त्यांच्या संघर्षांवर, त्यांनी मिळवलेल्या संधींवर आणि त्यांनी मिळवलेल्या यशावर प्रकाश टाकणारी, विद्यार्थ्यांसाठी एक शक्तिशाली धडा ठरली. त्यांचा व्यावहारिक सल्ला आणि वास्तविक जीवनातील अनुभव विद्यार्थ्यांना प्रचंड प्रेरणा देते आणि आयटी उद्योगात यशस्वी करिअर घडवण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करत होते. त्यांनी यावर जोर दिला की पदवीसोबतच कौशल्ये अत्यंत महत्त्वाची आहेत. आयटी क्षेत्रात करिअर सुरक्षित करण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी प्रोग्रामिंग ज्ञान, समस्या सोडवण्याची क्षमता, संवाद कौशल्ये, टीमवर्क, नवीन तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याची क्षमता आणि सतत शिकण्याची मानसिकता आवश्यक आहे. विद्यार्थी सत्राव्यतिरिक्त, महांकाळ यांनी प्राचार्य डॉ. एस. एम. खेर्डे, डीन आणि विभागप्रमुखांच्या उपस्थितीत प्राध्यापकांसाठी एक स्वतंत्र संवादात्मक सत्र देखील आयोजित केले होते. या चर्चेदरम्यान, अभ्यासक्रमाशी संबंधित विविध पैलूंचा आढावा घेतला आणि सध्याच्या उद्योग अपेक्षांनुसार अभ्यासक्रमात उद्योग- संबंधित विषयांचा समावेश करण्यासाठी महत्वाच्या सूचना दिल्या. ही चर्चा फलदायी आणि रचनात्मक होती आणि त्यामुळे विद्यार्थ्यांना आयटी उद्योगात करिअरसाठी चांगल्या प्रकारे तयार होण्यासाठी नक्कीच मदत होईल. या कार्यक्रमाला विद्यार्थी आणि प्राध्यापकांकडून उत्साहपूर्ण प्रतिसाद मिळाला. महाविद्यालयाच्या उद्योग-संस्था संवाद आणि कॉर्पोरेट संबंध कक्षाने हे आयोजन केले होते.संस्थेचे अध्यक्ष जगदीश गुप्ता, प्राचार्य डॉ. एस. एम.खेरडे, सर्व डीन, विभागप्रमुख, डीपीसी सदस्य आणि प्राध्यापकांचे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी त्यांच्या पाठिंब्याबद्दल आणि सहकार्याबद्दल मनापासून आभार मानले.

# शिक्षण हे स्वत्वाची जाणीव करून देणारे माध्यम : प्रोफेसर डॉ. ऋषिकेश कांबळे

## सिल्लोड येथील इंद्रराज महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :-**"शिक्षण हे केवळ उपजीविकेचे साधन नसून ते स्वत्वाची जाणीव करून देणारे आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी केवळ यंत्र न बनता संवेदनशील माणूस म्हणून व्यक्त व्हायला शिकले पाहिजे," असे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत प्रोफेसर डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी केले. अजिंठा एज्युकेशन अँड मिलिटरी प्रिपरेटरी इन्स्टिट्यूट संचलित, येथील इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभात ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव अशोक देवरे होते. व्यासपीठावर प्राचार्य प्रोफेसर जी. जी. राजपूत, उपप्राचार्य डॉ. व्ही. बी. लांब, विद्यार्थी संसद प्रभारी डॉ. अनिरुद्ध मोरे, सचिव संजीवनी कोटीये यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. कांबळे पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिलिंद महाविद्यालयात विद्यार्थी संसदेची मुहूर्तमेढ रोवली, त्यामागे राष्ट्रासाठी अभ्यासू व सक्षम नेतृत्व निर्माण व्हावे हीच भूमिका होती. आज समाजात संवेदनशीलता कमी होत असून जात-धर्माचे तट टोकदार होत आहेत. तंत्रज्ञान काळाची गरज असली तरी ते माणूसपण उद्ध्वस्त करणारे नसावे. विद्यार्थ्यांनी उच्च पदस्थ होऊन शेतकरी, कष्टकरी व दुर्बल घटकांचे प्रश्न सोडवावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणात अशोक देवरे यांनी स्पष्ट केले की, केवळ अभ्यासाचा ताण न घेता




विद्यार्थ्यांनी खेळ, गायन, नर्तन यांसारख्या छंदांनाही जोपासले पाहिजे. स्नेहसंमेलन हे अशा सुप्त गुणांना व्यासपीठ मिळवून देण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे. प्राचार्य डॉ. जी. जी. राजपूत यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात आपल्या आवडीच्या छंदांचे संगोपन करण्याचे आवाहन केले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अनिरुद्ध मोरे यांनी केले. त्यांनी स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता आणि आत्मविश्वास वाढत असल्याचे सांगितले. विद्यार्थी संसद सचिव संजीवनी कोटीये हिने मनोगत व्यक्त करताना स्नेहसंमेलनाला 'स्वत:ला शोधण्याचा उत्सव' संबोधले.

या सोहळयाला क्रीडा संचालक डॉ. माधवसिंग इंगळे, एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. कृष्णा नगरे, कल्याण पवार यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुचिता देशमुख यांनी केले, तर आभार प्रा. नितीन राजगुरू यांनी मानले.

# पीएचडी संशोधकांच्या फेलोशिप विलंबाचा आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून विधिमंडळात प्रश्न

**पनवेल (प्रतिनिधी) :** दलित-बहुजन समाजातील पीएच डी. संशोधक विद्यार्थ्यांच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत देण्यात येणाऱ्या मागील ४ ते ५ वर्षापासून फेलोशिपचा विषय आमदार प्रशांत ठाकूर यांनी तारांकित प्रश्नाद्वारे मांडला. त्यावर मंत्री संजय शिरसाट यांनी, टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत आणि इतर तत्सम स्वायत्त संस्थांमार्फत राबविल्या जाणाऱ्या अधिछात्रवृत्ती योजनेच्या निकष आणि नियमावलीबाबत योग्य कार्यवाही लवकरच करण्यात येणार असून .सध्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. विभागाचा अहवाल प्राप्त होताच, योग्य ती कार्यवाही तात्काळ करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.

राज्यातील दलित-बहुजन समाजातील पीएच डी. संशोधक विद्यार्थ्यांच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत देण्यात येणाऱ्या मागील ४ ते ५ वर्षापासून फेलोशिपच्या विलंबामुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले असून पीएच डी. संशोधक विद्यार्थ्यांसाठी समान धोरण रद्द करुन विद्यार्थ्यांच्या हिताचे न्यायपूर्ण धोरण राबविण्याची मागणी समर्थन संस्थेने मा. मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महासंचालक, डॉ. बाबासाहेब संशोधन आणि प्रशिक्षण व मानव विकास संस्था यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे दिनांक २२ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान केली आहे. याबाबत शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने सदर भागातील विद्यार्थ्यांसाठी बार्टी, सारथी व महाज्योती इत्यादी संस्थेच्या पी.एच.डी. फेलोशिप जाहिरात नियमित प्रसिध्द करण्यासाठी व इतर काही मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केला होता.

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी लेखी उत्तरात सांगितले कि, राज्यातील दलित-बहुजन समाजातील पीएच डी. संशोधक विद्यार्थ्यांच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत देण्यात येणाऱ्या मागील ४ ते ५ वर्षापासून फेलोशिपच्या विलंबामुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याची बाब खरी असून सन- २०२२ पर्यंत स्वायत्त संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती/शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला आहे. सन-२०२२ मध्ये बार्टी (विद्यार्थी संख्या ७६३), सारथी (विद्यार्थी संख्या १३२९), महाज्योती (विद्यार्थी संख्या १४५३ अशा एकूण ३५४५ संशोधक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती/शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती/शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याकरीता सन २०२३ व सन २०२४ या वर्षाच्या अधिछात्रवृत्ती योजनेची जाहिरात प्रसिध्द करावयाची कार्यवाही सुरु आहे. टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थामार्फत सर्वंकष धोरणातंर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींचा आढावा व सदर स्वायत्त संस्थांच्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता देण्याच्या अनुषंगाने उपरोक्त विषयाबाबत मा. मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११ सप्टेंबर, २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत अधिछात्रवृत्ती योजनेंतर्गत यु.जी.सी. मार्फत विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करून अधिछात्रवृत्ती योजनेचे निकष उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तयार करावेत. यामध्ये विद्यार्थ्यांचा वार्षिक प्रगती अहवाल तपासून उर्वरीत अनुदान वितरीत करण्याच्या प्रक्रियेचा समावेश करून त्यानुसार कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसांत सादर करावा, अशा उच्च व तंत्र शिक्षण विभागास सूचना देण्यात आल्या होत्या. तसेच, यापुर्वी टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती/शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याकरीता विद्यार्थ्यांमार्फत करण्यात येणाऱ्या आंदोलनाच्या अनुषंगाने मा.उप मुख्यमंत्री [नगर विकास, गृहनिर्माण व सा.बां. (सा.ऊ.)] महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८ ऑक्टोंबर, २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अहवाल तातडीने सादर करावा, असे निर्देश देण्यात आले होते. यानुषंगाने या विभागामार्फत टीआरटीआय, बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व इतर तत्सम स्वायत्त संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती योजनेचे निकष व नियमावलीसंबंधी पुढील उचित कार्यवाही लवकरात लवकर करणेबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागास विनंती करण्यात आली होती. याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून त्यांचा अहवाल प्राप्त होताच पुढील योग्य ती कार्यवाही तात्काळ करण्यात येईल.

# पहाटेच्या आगीत होतकरू तरुणाचे स्वप्न राख

## गोभणीतील सचिनभाऊ राऊत यांचे ६ लाखांचे नुकसान

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** (रिसोड)गोभणी येथे आज पहाटे सुमारे ५ वाजेच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत होतकरू तरुण सचिनभाऊ राऊत यांच्या किराणा दुकानाचे मोठे नुकसान झाले. या आगीत दुकानातील संपूर्ण साहित्य जळून खाक झाले असून अंदाजे ५ ते ६ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे अचानक दुकानातून धूर व ज्वाळा निघत असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. आग इतकी भीषण होती की काही क्षणांतच दुकानातील सर्व साहित्य आगीत भस्मसात झाले. या आगीत दुकानात उभी असलेली तीन वर्षे जुनी पल्सर दुचाकी देखील पूर्णपणे जळून नष्ट झाली.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तातडीने धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, भारतीय जनता पार्टी रिसोड ग्रामीणचे तालुकाध्यक्ष अमोल पाटील भुतेकर यांनीही घटनास्थळी भेट देत सचिनभाऊ राऊत यांची विचारपूस केली व त्यांना धीर देत शक्य ती मदत केली.

या दुर्दैवी घटनेनंतर गोभणी गावातील ग्रामस्थांनी एकदिलाने मदतीचा हात पुढे करत माणुसकीचे उत्तम उदाहरण दाखवले. अनेकांनी आर्थिक तसेच इतर प्रकारची मदत करण्याची तयारी दर्शवली आहे.

या घटनेमुळे सचिनभाऊ राऊत यांच्यावर मोठे आर्थिक संकट ओढवले असून गावातील व परिसरातील नागरिकांनी या होतकरू तरुणाला पुन्हा उभे राहण्यासाठी मदतीचा हात पुढे करावा, अशी भावनिक विनंतीही करण्यात येत आहे.



**गोभणी येथे लागलेल्या आगीत होतकरू तरुण सचिनभाऊ राऊत यांचे मोठे नुकसान झाले आहे. अशा कठीण प्रसंगी समाजाने पुढे येऊन या तरुणाला आधार देणे अत्यंत गरजेचे आहे. गावातील नागरिक, व्यापारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी आपल्या परीने आर्थिक तसेच इतर प्रकारची मदत करून त्यांना पुन्हा उभे राहण्यासाठी हातभार लावावा. आम्हीही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. समाजाने माणुसकी जपत मदतीचा हात पुढे करावा,**

**– अमोल पाटील भुतेकर**
**तालुकाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी – रिसोड ग्रामीण**

# दुबळवेल येथे 'स्वामिनी फार्मा प्रॉड्युसर कंपनी'च्या चिया प्रोसेसिंग युनिटचा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** मालेगाव (वाशिम) तालुक्यातील दुबळवेल येथे युवा उद्योजक गोपालभाऊ देवढे यांच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या स्वामिनी फार्मा प्रॉड्युसर कंपनी व स्वामिनी ट्रेडर्सच्या उद्घाटन सोहळ्याचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. शेतीला पर्यायी व बाजारपेठेत मोठी मागणी असलेल्या चिया पिकाच्या प्रोसेसिंग युनिटचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

सध्याच्या बदलत्या हवामानामुळे पारंपरिक सोयाबीन, हरभरा यांसारख्या पिकांच्या उत्पादनावर परिणाम होत असून अनेक शेतकरी पर्यायी पिकांकडे वळत आहेत. अशा परिस्थितीत चिया पिकाच्या माध्यमातून प्रक्रिया उद्योग उभारून गोपालभाऊ देवढे यांनी युवा शेतकऱ्यांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चिया या पिकाला



मोठी मागणी आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे व प्रक्रिया सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने दुबळवेल येथे उभारण्यात आलेले स्वामिनी फार्मा प्रॉड्युसर कंपनीचे चिया प्रोसेसिंग युनिट अत्यंत महत्त्वाचे ठरणार असल्याचे मत उद्घाटन प्रसंगी शिवसेना संपर्क प्रमुख संजनाताई गवळी पाटील यांनी व्यक्त केले.

या उद्योगामुळे शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवर प्रक्रिया सुविधा उपलब्ध होणार असून उत्पादनाला अधिक मूल्य मिळण्यास मदत होणार आहे. तसेच ग्रामीण भागातील युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

या उद्घाटन सोहळ्याला जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक पूनम घुले, ज्येष्ठ पत्रकार माधवराव अंभोरे, वाशिम नगराध्यक्ष अनिल केंदळे, शिवसेना जिल्हाप्रमुख महादेवराव ठाकरे, विजय खानझोडे, जिल्हा समन्वयक गजानन शिंदे, शिवसेना तालुका प्रमुख प्रदीप पाटील कुटे, उपजिल्हाप्रमुख मंगेश महाराज घुगे, लक्ष्मणराव गावंडे, संजय भुतेकर, तालुका समन्वयक विलासराव जाधव, राजेश कव्हर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी गोपालभाऊ देवढे यांच्या या उद्योग उपक्रमाचे कौतुक करत ग्रामीण भागात अशा उद्योगांची उभारणी झाल्यास शेतकऱ्यांना मोठा फायदा होईल, असे मत व्यक्त केले.

**बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेतीपद्धतीत बदल करणे अत्यावश्यक झाले आहे. केवळ उत्पादनावर अवलंबून न राहता शेतकऱ्यांनी प्रक्रिया उद्योग उभारल्यास उत्पादनाला अधिक मूल्य मिळते आणि उत्पन्न वाढण्यास मदत होते. स्वामिनी फार्मा प्रॉड्युसर कंपनीसारखे उपक्रम जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरतील.**

**– योगेश कुंभेजकर**
**जिल्हाधिकारी**

**चिया पिकाला देश-विदेशात मोठी मागणी असून त्यातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळू शकते. दुबळवेल येथे सुरू झालेले प्रोसेसिंग युनिट शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे व बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावेल. ग्रामीण भागातील तरुणांनीही उद्योग क्षेत्रात पुढे यावे.**


**– संजनाताई गवळी पाटील**
**शिवसेना संपर्क प्रमुख**

# पक्षी विद्युत तारांवर निवांत कसे बसतात?

**विज्ञान वार्ता**

**डॉ सुनिल भगत नागपूर :** आपण अनेकदा पक्षी विजेच्या तारांवर निर्धास्तपणे बसलेले पाहतो. माणसाचा विजेच्या तारेला स्पर्श जरी झाला तरी त्याला विजेचा तीव्र धक्का बसतो, परंतु उच्च दाबाच्या तारेवर बसूनही पक्ष्यांना विजेचा धक्का कसा बसत नाही, असा प्रश्न आपल्याला पडतो.

कुठलीही गोष्ट दोन बिंदूंमधून वाहण्यासाठी त्या दोन बिंदूंच्या पातळीमध्ये फरक असावा लागतो. विद्युतप्रवाह वाहतानासुद्धा विद्युत प्रवाहाच्या सर्किट म्हणजेच परिपथाच्या दोन बिंदूंमध्ये व्होल्टेजचा फरक म्हणजेच विभवांतर असतं. जसं पाणी जास्त उंचीवरून कमी उंचीकडे वाहतं. तसाच विद्युतप्रवाह जास्त विद्युतदाबाकडून म्हणजे जास्त विभवाकडून, कमी विद्युतदाबाकडे म्हणजेच कमी विभवाकडे वाहतो.आपल्या घरातल्या विजेच्या तारा सुरक्षित असतात; कारण त्यावर असलेलं प्लॅस्टिकचं आवरण (इन्सुलेशन) विद्युतरोधक असतं. या तारांमध्ये उच्च विद्युतदाब असतो तर जमिनीला शून्य विद्युतदाब असतो. जर तारांवरचं आवरण



नसेल आणि आपण त्या तारेला स्पर्श केला, तर आपल्या शरीरामुळे, तार आणि जमीन जोडले जातात. तार आणि जमीन यांच्यात विभवांतर असल्यामुळे साहजिकच विद्युतप्रवाह जास्त दाबाकडून, आपल्या शरीराच्या माध्यमातून जमिनीकडे वाहतो आणि आपल्याला विद्युतधारेचा धक्का बसतो.पण कोणताही पक्षी जेव्हा विद्युतधारेच्या उघड्या तारेवर बसतो, तेव्हा त्याचे दोन्ही पाय एकाच तारेला स्पर्श करत असतात. त्या तारेवर विद्युतदाब सगळीकडे जवळजवळ समान असल्यामुळे, पक्ष्याच्या दोन्ही पायांमध्ये कोणतंही लक्षणीय विभवांतर नसतं आणि विभवांतर नसल्यामुळे विद्युतप्रवाह वाहत नाही. त्यामुळे विद्युतप्रवाह पक्ष्याच्या शरीरातून जात नाही. कोणत्याही उपकरणामधून वा तारेमधून विद्युतप्रवाह वाहत असेल, तर त्याला तारेकडून वा त्या उपकरणातल्या पदार्थाकडून थोडाफार रोध (विरोध) होत असतो. त्या पदार्थानुसार म्हणा किंवा धातूनुसार हा रोध कमी जास्त असतो. विद्युतप्रवाह नेहमी कमीत कमी रोधाचा मार्ग निवडतो. तारेचा रोध हा त्या तारेवर बसलेल्या पक्ष्याच्या शरीराच्या रोधापेक्षा खूप कमी असल्यामुळे, विद्युतप्रवाह पक्ष्याच्या शरीरातून न वाहता त्या तारेतून वाहतो. थोडक्यात, विद्युतप्रवाह वाहणाऱ्या कोणत्याही 'एकाच' तारेवर बसून, पक्षी आनंदाने झोके घेऊ शकतो. पण, जर एखाद्या पक्ष्याने एकाच वेळी ज्यांच्यामध्ये विद्युतदाबाचा फरक आहे, अशा दोन वेगवेगळ्या तारांना किंवा एक तार आणि जमिनीला स्पर्श केला, तर सर्किट म्हणजे विद्युतपरिपथ पूर्ण होईल. अशा परिस्थितीत, विद्युतधारा त्या पक्ष्याच्या शरीरातून प्रवाहित होऊन त्याला तीव्र धक्का बसू शकेल. घार, गरुडासारख्या मोठ्या पक्ष्यांच्या बाबतीत, ते एका तारेवर असतील आणि जर त्यांच्या पंखाचा दुसऱ्या तारेला स्पर्श झाला तर त्यांना विजेचा धक्का बसण्याची शक्यता असते.

# रिसोड सिटी न्यूजचे मुख्य संपादक अर्जुन पाटील खरात (मामाश्री) यांचा वाढदिवस ठिकठिकाणी उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** रिसोड (वाशिम)सामाजिक कार्यात नेहमी सक्रिय असलेले रिसोड सिटी न्यूजचे मुख्य संपादक, पुण्यनगरीचे तालुका प्रतिनिधी तसेच संभाजी ब्रिगेडचे वाशिम जिल्हाध्यक्ष श्री. अर्जुन पाटील खरात (मामाश्री) यांचा वाढदिवस विविध सामाजिक व राजकीय संघटनांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

अर्जुन पाटील खरात हे पत्रकारिता, सामाजिक कार्य आणि संघटनात्मक क्षेत्रात सातत्याने कार्यरत राहून समाजातील विविध प्रश्नांवर आवाज उठवणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवणे, समाजातील वंचित घटकांसाठी न्याय मिळवून देणे तसेच विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून जनजागृती करणे अशा अनेक क्षेत्रांमध्ये त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.

त्यांच्या वाढदिवसानिमित्त वंचित बहुजन आघाडी पळसखेडा, राजश्री शाहू मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह बँक रिसोड, संभाजी ब्रिगेड वाशिम जिल्हा, मराठा सेवा संघ रिसोड तालुका, व्हॉईस ऑफ मीडिया रिसोड तालुका, नगरपरिषद रिसोड तसेच शिव सूर्य प्रतिष्ठान रिसोड यांच्या वतीने त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी विविध मान्यवरांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

अर्जुन पाटील खरात यांनी पत्रकारिता क्षेत्रातून समाजातील प्रश्न मांडत अनेकदा सर्वसामान्य जनतेचा आवाज बुलंद केला आहे. सामाजिक सलोखा, युवकांना योग्य दिशा आणि समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्याबद्दल समाजातील विविध स्तरातून त्यांचे कौतुक केले जात आहे.

त्यांच्या वाढदिवसानिमित्त अनेक कार्यकर्ते, मित्रपरिवार, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी तसेच नागरिकांनी भेट देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्वांनी त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देत त्यांचे समाजकार्य अधिक जोमाने पुढे सुरू राहावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

**"माझ्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक, राजकीय संघटना, मित्रपरिवार तसेच नागरिकांनी दिलेल्या शुभेच्छांचा मी मनापासून स्वीकार करतो. आपले असेच प्रेम, आशीर्वाद आणि पाठबळ कायम राहो हीच अपेक्षा. सर्वांचे मन:पूर्वक आभार."**

**— अर्जुन पाटील खरात**
**(मामाश्री) मुख्य संपादक रिसोड सिटी न्यूज.**

# अर्थसंकल्पातील नागपूर जिल्हा

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू**

**संपादक नागपूर विभाग :** विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत तर विधानपरिषदेत वित्त राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल यांनी २०२६-२७ या वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पातील नागपूर जिल्ह्याशी संबंधित काही महत्वाच्या तरतुदी तसेच वैशिष्टये पुढीलप्रमाणे ...

- नवरगाव, रामटेक येथे राज्यातील तिसरी चित्रनगरी विकसित करणार, महाकवी कालिदास यांचे जीवनचरित्र नव्या पिढ्यांना कळण्यासाठी चित्रपट निर्मिती करणार

- रामटेक विकास आराखडा टप्पा-2 ची कामे करणार

नागपूर - गोंदिया, भंडारा - गडचिरोली, नागपूर - चंद्रपूर अशा प्रवेश नियंत्रित शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गांना मान्यता

नागपूर शहराच्या आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी नवीन नागपूर या नावाने व्यापार व वित्तीय केंद्र विकसित करणार

नागपूर शहराच्या विस्तार व विकासाला चालना देण्यासाठी नागपूर रिंगरोडला मान्यता

मुंबई महानगराच्या धर्तीवर 'पुणे, नाशिक, नागपूर व छत्रपती संभाजीनगर ग्रोथ हब' साठी नीती आयोग रोड मॅप तयार करणार

- राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था, मिहान नागपूर येथे, नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीचे सौम्यीकरण संशोधन, अभ्यासपूर्ण व्यवस्थापनासाठी.

मुंबई, पुणे व नागपूर साठी 490 किमी मेट्रोचे जाळे , 173 किमीच्या मार्गिका खुल्या

सार्वजनिक आरोग्याच्या सर्वंकष उन्नतीसाठी एम्स, आयआयएमच्या धर्तीवर उच्च गुणवत्तेच्या प्रशिक्षण आणि संशोधनासाठी नागपूर येथे 'महाराष्ट्र आरोग्य सार्वजनिक संस्था' स्थापन करणार. भारतीय सार्वजनिक आरोग्य संस्था यासाठी सहकार्य करणार.

राज्याच्या सार्वभौम डेटा, अनुप्रयोगांची सुरक्षितता यासाठी नागपूर येथे अत्याधुनिक स्टेट डेटा सेंटर स्थापन करणार

# २०४७ च्या विकसित महाराष्ट्राची दिशा ठरवणारा अर्थसंकल्प – महसूल मंत्री बावनकुळे

**दैनिक युवक आधार**

**मुंबई वार्ताहर :** मुख्यमंत्री, अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला राज्याचा अर्थसंकल्प हा केवळ आकडेवारीचा दस्तऐवज नसून वास्तवाची जाणीव ठेवत २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्र घडविण्याचा प्रगतीशील, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाचा रोडमॅप असल्याची प्रतिक्रिया महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली.

या अर्थसंकल्पात शेतकरी, महिला, युवक, उद्योग तसेच ग्रामीण आणि नागरी भागाच्या विकासाचा समतोल साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना कायम ठेवण्याच्या घोषणेमुळे राज्यातील कोट्यवधी शेतकरी बांधव आणि महिलांना मोठा दिलासा मिळाला असल्याचे त्यांनी नमूद केले.३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंत 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर करण्यात आली आहे. तसेच नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय हा शेतकऱ्यांना न्याय देणारा असल्याचे मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

महाराष्ट्राच्या चौफेर विकासाची सर्वसमावेशक मांडणी या अर्थसंकल्पात करण्यात आली असून ग्रामीण विकासासोबतच नागरी भागातील सर्व घटकांचा विकास साधण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे. सन २०४७ पर्यंत राज्यातील सुमारे ७० टक्के लोकसंख्या नागरी भागात राहणार असल्याचे लक्षात घेऊन राज्यात दहा ठिकाणी नागरी शहरी विकास प्राधिकरणे स्थापन करण्यासोबतच एक हजार लोकसंख्या असलेली गावे कॉंक्रिट रस्त्यांनी जोडण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे.

थोर समाजसुधारकांच्या स्मरणार्थ येणारे वर्ष "सामाजिक समता व समरसता वर्ष" म्हणून साजरे करण्याची घोषणा ही सामाजिक जाणीवेची महत्त्वपूर्ण बाब असल्याचे मंत्री बावनकुळे यांनी नमूद केले. तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या संसदीय कारकिर्दीची दखल म्हणून "गतिमान नागरी सेवा पुरस्कार" देण्याची घोषणा ही त्यांना वाहिलेली आदरांजली असल्याचे त्यांनी सांगितले.

पायाभूत सुविधा, रोजगार, उद्योग, शेतीविकास, ग्रामविकास, ऊर्जा, विमानतळे, रस्ते, मेट्रो, रेल्वे वाहतूक विकास, प्रशासनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, विकसित पर्यटन, परवडणारी घरे, तिसरी मुंबई, रामटेकजवळ तिसरी चित्रपट नगरी, नवीन नागपूर, विद्यार्थ्यांसाठी आर्थिक सवलती, स्टार्टअपला प्रोत्साहन, आरोग्य सुविधा, सांस्कृतिक वारसा संवर्धन, क्रीडा गुणवत्ता विकास केंद्रे, शासनात ७५ हजार नवीन पदभरती, नागरिकांच्या मालमत्ता हक्कांचे संरक्षण, स्मार्ट पोलिसिंग, महसूल व्यवस्थेचे आधुनिकीकरण, सार्वजनिक-खासगी भागीदारी धोरण, पर्यावरण संरक्षण तसेच मुद्रांक अधिनियमातील सुधारणा अशा विविध निर्णयांमुळे हा अर्थसंकल्प वेगवान आणि लोकाभिमुख सरकारची दिशा दर्शवणारा असल्याचे बावनकुळे यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला हा अर्थसंकल्प राज्यातील नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवेल, असा विश्वास व्यक्त करत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# दापुरी खुर्द येथे Jio नेटवर्क ठप्प ; नागरिक हैराण

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** रिसोड तालुक्यातील दापुरी खुर्द गावामध्ये जिओ कंपनीचा मोबाईल नेटवर्क टॉवर उभारण्यात आलेला असला तरी नागरिकांना अपेक्षित दर्जाची सेवा मिळत नसल्याची गंभीर तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.द युवा ग्रामीण पत्रकार संघा चे वाशीम जिल्हाध्यक्ष संतोष भालेराव यांनी या प्रश्नाकडे लक्ष वेधत पुढाकार घेतला आहे. गेल्या दोन वर्षांपासून गावातील इंटरनेट सेवा अत्यंत मंद गतीने सुरू असून



अनेक वेळा पूर्णपणे बंद पडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

गावातील नागरिक नियमितपणे जिओचे रिचार्ज करत असतानाही समाधानकारक सेवा मिळत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. इंटरनेट सेवा खंडित होत असल्यामुळे ऑनलाइन शैक्षणिक उपक्रम, शासकीय कामे, बँकिंग व्यवहार तसेच इतर डिजिटल सेवा यामध्ये अडथळे निर्माण होत आहेत.

तसेच आऊटगोइंग व इनकमिंग कॉलदरम्यान संभाषण अचानक खंडित होणे, आवाज अस्पष्ट येणे अशा तक्रारी वारंवार होत आहेत. गावात सुशिक्षित नागरिकांची संख्या मोठी असून विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी व नोकरदार वर्गाला नेटवर्कअभावी मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.डिजिटल युगातही मूलभूत दूरसंचार सुविधा व्यवस्थित उपलब्ध नसल्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. शासनाने तसेच संबंधित कंपनीने तात्काळ दखल घेऊन नेटवर्क समस्या कायमस्वरूपी सोडवावी, आवश्यक असल्यास अतिरिक्त मोबाईल टॉवर उभारावा किंवा विद्यमान टॉवरची क्षमता वाढवावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.लवकरात लवकर ठोस उपाययोजना करून दापुरी खुर्द येथील नागरिकांना दर्जेदार नेटवर्क सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# 2047 च्या विकसित महाराष्ट्रासाठी अर्थसंकल्पाचा रोडमॅप; तर विरोधकांची सरकारवर जोरदार टीका

## शेतकरी कर्जमाफी, लाडकी बहिण योजना कायम; नागपूरसाठी तिसरी चित्रनगरी व नवीन नागपूर वित्तीय केंद्राची घोषणा

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** राज्याचे मुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सादर केलेल्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्र घडविण्याचा रोडमॅप मांडण्यात आला आहे. मात्र या अर्थसंकल्पावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार राजकीय वाद निर्माण झाला आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा अर्थसंकल्प प्रगतीशील, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाचा दस्तऐवज असल्याचे सांगितले. शेतकरी, महिला, युवक, उद्योग तसेच ग्रामीण आणि नागरी भागाच्या विकासाचा समतोल



साधण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पात करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.

शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत पीक कर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंत 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर करण्यात आली आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना कायम ठेवण्याची घोषणाही करण्यात आली असून त्यामुळे राज्यातील महिलांना मोठा आधार मिळणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

राज्याच्या नागरीकरणाचा वेग लक्षात घेऊन दहा ठिकाणी नवीन नागरी शहरी विकास प्राधिकरणे स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच एक हजार लोकसंख्या असलेली गावे कॉंक्रिट रस्त्यांनी जोडण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला जाणार आहे.

पायाभूत सुविधा, उद्योग, रोजगार, शेतीविकास, ऊर्जा, पर्यटन, मेट्रो, विमानतळे, रस्ते आणि रेल्वे वाहतूक यावर मोठा भर देण्यात आला आहे. शासनात ७५ हजार नवीन पदभरती, परवडणारी घरे, स्मार्ट पोलिसिंग, महसूल व्यवस्थेचे आधुनिकीकरण आणि पर्यावरण संरक्षणासाठीही विविध उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

**नागपूरला विशेष प्राधान्य**

या अर्थसंकल्पात नागपूर जिल्ह्यासाठीही अनेक महत्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. रामटेकजवळ नवरगाव येथे राज्यातील तिसरी चित्रनगरी उभारण्यात येणार असून नागपूर शहरासाठी 'नवीन नागपूर' या नावाने व्यापार व वित्तीय केंद्र विकसित करण्यात येणार आहे. तसेच नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली आणि नागपूर-चंद्रपूर द्रुतगती मार्गांना मान्यता देण्यात आली आहे.

नागपूर येथे राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था, अत्याधुनिक स्टेट डेटा सेंटर तसेच सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील उच्च दर्जाच्या प्रशिक्षण व संशोधनासाठी 'महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्था' स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली आहे. मुंबई, पुणे आणि नागपूरसाठी ४९० किमी मेट्रो जाळ्याचा विस्तारही प्रस्तावित आहे.

**विरोधकांचा सरकारवर हल्लाबोल**

दरम्यान, या अर्थसंकल्पावर कॉंग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी तीव्र टीका केली. हा अर्थसंकल्प संपूर्ण महाराष्ट्राचा नसून मुंबई आणि एमएमआर क्षेत्रासाठी असल्याचा आरोप त्यांनी केला. ग्रामीण भाग, सिंचन, शिक्षण आणि आरोग्यासाठी ठोस तरतूद नसल्याचे त्यांनी सांगितले.

राज्याचे कर्ज वाढत असून सरकार महाराष्ट्राला कर्जाच्या खाईत लोटत असल्याचा आरोप करत वडेट्टीवार यांनी सरकारवर उपरोधिक टीका केली. "आज लग्न लावले असून अपत्य २०४७ मध्ये होईल," असा टोला त्यांनी लगावला.

यामुळे राज्याचा अर्थसंकल्प विकासाचा रोडमॅप की केवळ घोषणांचा पाऊस, यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार राजकीय चर्चा रंगली आहे.

# मुलांच्या यशामागील प्रेरणादायी मातृशक्ती – योगिता शिंदे यांना 'राजमाता जिजाऊरत्न' पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** कुटुंब, समाज आणि शिक्षण क्षेत्रात प्रेरणादायी कार्य करत आपल्या मुलांना उच्च शिक्षणाच्या शिखरावर पोहोचविणाऱ्या निफाड शहरातील योगिता शिंदे यांना महाराष्ट्र राज्य मराठा सेवा संघाच्या वतीने सन २०२५ चा 'राजमाता जिजाऊरत्न पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची, महिलांसाठी केलेल्या उपक्रमांची आणि मुलांच्या घडवणुकीत दिलेल्या योगदानाची दखल घेत हा सन्मान देण्यात आला.

उच्च शिक्षण घेतलेले असूनही नोकरी किंवा व्यवसायाच्या मागे न लागता आपल्या कुटुंबाच्या आणि मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या योगिता शिंदे यांनी मातृत्वाचे आदर्श उदाहरण समाजासमोर ठेवले आहे. एम.ए., बी.एड. शिक्षण घेतलेल्या योगिता शिंदे यांनी आपल्या मुलांना बालपणापासूनच राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार व आदर्श यांची प्रेरणा दिली. शिक्षण, संस्कार आणि समाजाबद्दलची



जाणीव यांचे महत्त्व त्यांनी मुलांना सातत्याने पटवून दिले.

त्यांच्या या मार्गदर्शनामुळे त्यांचा मुलगा प्रणव शिंदे हा बी.टेक. (मेकॅनिकल इंजिनिअरिंग) शिक्षण पूर्ण करून भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाअंतर्गत कार्यरत असलेल्या डीआरडीओ, चेन्नई येथे डिझाईन इंजिनिअर म्हणून कार्यरत आहे. तर मुलगी कु. लावण्या शिंदे ही भारतातील सुप्रसिद्ध डॉ. रेड्डी मेडिकल इन्स्टिट्यूट येथे एमबीबीएसचे शिक्षण घेत असून वैद्यकीय क्षेत्रात आपले करिअर घडवत आहे. मुलांच्या यशामागे आई म्हणून दिलेले मार्गदर्शन, संस्कार आणि सातत्यपूर्ण प्रेरणा यांचा मोठा वाटा असल्याचे अनेकांनी नमूद केले आहे.

योगिता शिंदे यांचे पती निलेश शिंदे हे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा निफाड क्रमांक १ येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. पतीच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्यात योगिता शिंदे नेहमीच सक्रिय सहभाग घेतात. विशेषतः निफाड शहरातील एकल माता पालक तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण आणि कल्याणासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील आहेत.

त्याचबरोबर योगिता शिंदे या नाशिक जिल्हा मराठा सेवा संघ आणि जिजाऊ ब्रिगेडच्या सक्रिय सदस्या आहेत. नाशिक जिल्ह्यातील आधार आश्रमातील महिला व मुलींसाठी विविध उपक्रम राबवून त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याचे कार्य त्यांनी केले आहे. महिला सक्षमीकरण, शिक्षण आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी त्यांनी विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत.

सारथी संस्थेच्या विविध शासकीय योजनांचा लाभ मराठा समाजातील विद्यार्थ्यांना मिळावा यासाठीही त्या सातत्याने प्रयत्न करीत असतात. विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन देणे, विविध योजनांची माहिती पोहोचवणे आणि त्यांना लाभ मिळवून देण्यासाठी त्या सक्रियपणे कार्यरत आहेत.

मराठा उद्योजक महिला कक्षाच्या (एमयूएमके) सदस्या म्हणूनही त्यांनी गरजू महिलांसाठी रोजगाराच्या नव्या संधी आणि तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शनपर शिबिरांचे आयोजन केले आहे. महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांचे हे प्रयत्न विशेष उल्लेखनीय मानले जातात.

याशिवाय सध्याच्या बदलत्या जीवनशैलीच्या पार्श्वभूमीवर आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी महिला आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यातही त्यांनी सक्रिय भूमिका बजावली आहे. समाजातील महिलांचे आरोग्य, शिक्षण आणि स्वावलंबन यासाठी त्यांनी सातत्याने काम केले आहे.

सामाजिक, शैक्षणिक आणि महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात केलेल्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य मराठा सेवा संघाच्या वतीने योगिता शिंदे यांना सन २०२५ चा 'राजमाता जिजाऊरत्न पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले आहे. त्यांच्या या कार्याबद्दल समाजातील विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत असून त्यांच्या कार्यातून अनेक महिलांना प्रेरणा मिळत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# पाणंद रस्त्यांची सात–बारा उताऱ्यावर नोंद होणार – मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

### आ. प्रशांत ठाकूर, आ. महेश बालदी यांनी वेधले शासनाचे लक्ष

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( प्रतिनिधी) :** राज्यात पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी सुरू असलेल्या मोहिमेबाबत आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे शासनाचे लक्ष वेधले होते. त्यानुसार राज्यातील पाणंद (शेत) रस्ते अतिक्रमणमुक्त करून त्यांची नोंद सात-बारा उताऱ्यावर करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. गाव नकाशावर दिसणाऱ्या शेत किंवा पाणंद रस्त्यांची नोंद सात-बारा उताऱ्यावरील 'इतर हक्क' या सदरात करण्यात येणार असून यासाठी ई-फेरफार प्रणालीमध्ये तांत्रिक बदल केले जात असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

राज्यात पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी मोहिम सुरू केली असून त्यामुळे भूमी अभिलेख विभागाने पाणंद रस्ते नकाशावर दिसत असल्यास त्यांची नोंद सात-बारा उताऱ्यावर करण्यात येणार असल्याचे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे. या मोहिमेचा भाग म्हणून सात-बारा उताऱ्यावर पाणंद रस्त्यांची नोंद घेण्यास सुरूवात केली काय व किती महिन्यांत सदर मोहिम पूर्ण करण्यात येणार आहे, त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा तारांकित प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी दाखल केला होता.

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या संदर्भात दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले कि, पाणंद रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी मोहिम सुरू केली असून त्यामुळे भूमी अभिलेख विभागाने पाणंद रस्ते नकाशावर दिसत असल्यास त्यांची नोंद सात-बारा उताऱ्यावर करण्यात येणार आहे. दिनांक २२ मे २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम १४३ आणि मामलेदार कोर्ट ॲक्ट, १९०६ च्या कलम ५ नुसार आदेश पारित करताना शेत रस्ता जात असलेल्या शेताचा गट नं. / सर्वे नं. शेतरस्त्याची रुंदी, लांबी, दिशा व सीमा इत्यादी बाबत ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्क या सदरात नोंद घेण्याबाबत सक्षम अधिकारी / प्राधिकारी यांना दिशानिर्देश देण्यात आलेले आहेत. यानुसार क्षेत्रीयस्तरावर ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्क या सदरात नोंद घेण्यात येत आहेत. गाव नकाशावरील शेत/पाणंद रस्त्याची नोंद ७/१२ उता-यावर इतर हक्क या सदरी नोंद घेण्यासाठी ई-फेरफार प्रणालीमध्ये नव्याने विकसन करण्याबाबत जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे यांचेकडून राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर विकसनाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर संबधित नोंदी ऑनलाईन प्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्यात येतील.

# महागाव तालुक्यात 'राजस्व समाधान शिबिर' ठरले लाभदायी; १३७६ जणांना योजनांचा लाभ

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे/महागाव (यवतमाळ) :** महागाव तालुक्यात महाराष्ट्र शासनाच्या 'छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर अभियान – टप्पा १' अंतर्गत हिवरा (संगम) येथे आयोजित करण्यात आलेले समाधान शिबिर आज उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडले. या शिबिराच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार अभय मस्के होते.

शिबिरात महसूल विभागाशी संबंधित प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासह विविध शासकीय योजनांचा लाभ नागरिकांना तात्काळ देण्यात आला. यावेळी एकूण १३७६ लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला.नायब तहसीलदार गजानन



पराते,पुरवठा निरीक्षक मोहन कोल्हे,म

कार्यक्रमास तालुका कृषी अधिकारी अंकुश टकले, तालुका आरोग्य अधिकारी निमिष धुळधुळे, उपअधीक्षक भूमिअभिलेख कलावती आडे, मंडळ अधिकारी मारोती एकूलवार,गोविंद ठाकरे,सचिन फटाले,शिवकांत माने,महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे व्यवस्थापक दवने, माजी जिल्हा परिषद सदस्य विलास भुसारे, शरद कदम, राजू धोतरकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. तसेच विद्यार्थी, लाभार्थी व गावकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.या शिबिरामध्ये प्रलंबित फेरफार प्रकरणे, ७/१२ व ८अ उताऱ्यांतील त्रुटी दुरुस्ती, अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क, डिजिटल उतारे उपलब्ध करून देणे यासह उत्पन्न, रहिवासी, जात व क्रीमीलेअर प्रमाणपत्रे, पीएम किसान, ॲग्रीस्टॅक तसेच इतर शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन व सेवा देण्यात आल्या.यावेळी अनेक लाभार्थ्यांनी या शिबिरामुळे आपली कामे तत्काळ मार्गी लागल्याचे सांगत "ही योजना आमच्यासाठी देवदूत ठरली" अशी भावना व्यक्त केली व शासनाचे आभार मानले.

# नागपूर विद्यापीठातील समस्यांवर सिनेट सदस्यांचे लक्ष वेधले;विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी भाजयुमो विद्यार्थी आघाडीचा पुढाकार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी/नागपूर :** भारतीय जनता पार्टी नागपूर शहर अध्यक्ष दयाशंकरजी तिवारी तसेच भारतीय जनता युवा मोर्चा नागपूर शहर अध्यक्ष सचिन करारे यांच्या मार्गदर्शनात भाजयुमो विद्यार्थी आघाडीचे संपर्क प्रमुख शंतनु झाडे यांच्या नेतृत्वात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील विविध शैक्षणिक व प्रशासकीय समस्यांबाबत सिनेट सदस्यांना निवेदन देण्यात आले.भाजयुमो विद्यार्थी आघाडीच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनामध्ये विद्यापीठातील विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अनेक गंभीर प्रश्नांकडे लक्ष वेधण्यात आले. सध्या अनेक परीक्षांचे निकाल दीर्घकाळ प्रलंबित राहणे, प्रवेश व परीक्षा प्रक्रियेमध्ये पारदर्शकतेचा अभाव तसेच विद्यार्थ्यांच्या तक्रारींना वेळेवर प्रतिसाद न मिळणे यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अस्वस्थता निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले.तसेच पीएचडी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेली आर आर सी (Research and Recognition Committee) प्रक्रिया अनेक ठिकाणी प्रलंबित असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. आर आर सी बैठका वेळेवर न झाल्यामुळे संशोधक विद्यार्थ्यांच्या संशोधन कार्यास विलंब होत असून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत असल्याची बाब सेनेट सदस्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली.यावेळी भाजयुमो विद्यार्थी आघाडीच्या वतीने विद्यापीठ प्रशासनाकडे काही महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या. यामध्ये सर्व प्रलंबित परीक्षांचे निकाल तात्काळ जाहीर करणे, प्रवेश व परीक्षा प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी प्रभावी डिजिटल प्रणाली विकसित करणे, विद्यार्थ्यांच्या समस्या व तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी स्वतंत्र विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन करणे तसेच पीएचडी विद्यार्थ्यांच्या प्रलंबित आर आर सी बैठका तातडीने आयोजित करण्याची मागणी करण्यात आली.

# उरण तालुक्यातील नवघर गावात अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरीचे पारायण सोहळा व दिंडी मिरवणूक !!

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर :** उरण तालुक्यातील नवघर गावात श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी सांप्रदाय संस्थापक रायगड भुषण ह.भ.प.प्रभाकर महाराज यांच्या वतीने नवघर गावात अनेक वर्षांपासून चालू असलेली फाल्गुन कृष्ण ३ संकष्ट चतुर्थीच्या दिवशी अखंड हरिनाम व ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी पारायणाची सकाळी ४-३० वाजता सुरवात होऊन ग्रंथ ज्ञानेश्वरीचे अध्याय ९ , १२ , व १८ चे वाचन श्री हनुमान मंदिरात चालू असून शुक्रवार दि.०६/०३/२०२६ रोजी काकडा :- माऊली हरिपाठ (नवघर पाडा),ह.भ.प.लक्ष्मण महाराज बंडा, ह.भ.प.गजानन महाराज ठाकुर (बेलपाडा?,ह.भ.प. कमळूबाई,ह.भ.प.मनोहर बुवा,ह.भ.प.रमेश सोनकर,ह.भ.प. कमळाकर म्हात्र(शेवे),ह.भ.प.गिता बंडा,ययाती बंडा,जमुना बंडा,वंदना बंडा,रजनी बंडा,संगिता बंडा,चंद्रकांत बंडा,शारदा बंडा,प्रभावती बंडा,शिला बंडा,उर्मिला बंडा,भिमाबाई दमयंती




बंडा,जया बंडा,नंदा बंडा,मालती बंडा,जयश्री बंडा,प्रशांत बंडा तर ग्रामदेवतेचे अभिषेक व महापुजा :- विश्वास बळीराम तांडेल(मा.उपसरपंच नवघर) व विजय पुरूषोत्तम तांडेल यांच्या शुभहस्ते करून ज्ञानेश्वरी वाचन सकाळी ८-०० ते १२-०० वाजता चालक ह.भ.प. मनोज महाराज ठाकुर(बेलपाडा) व ह.भ.प.बाळकृष्ण महाराज भगत(गव्हान) यांच्या मार्गदर्शनाखाली होऊन सायंकाळी ४-३० ते ५-३० वाजता जयशिव शंकर प्रासादीक भजन मंडळ(आवरे) बुवा तज्ञेश भगत(भेंडखळ) पखवाज वादक - चैतन्य बंडा,संत जनाबाई भजन मंडळ(भेंडखळ),ह.भ.प.भास्कर महाराज कोळी(गव्हाण) तर ५-३० ते ६-३० वाजता हरिस्मरण वारकरी सांप्रदायी मंडळ,वशेणी चालक ह.भ.प.अनिल महाराज गावंड श्रीकृष्ण हरिपाठ मंडळ बेलपाडा चालक ह.भ.प.गजानन महाराज,गणेश हनुमान हरिपाठ मंडळ डोळघर तसेच श्री जगतगुरू संत तुकाराम महाराज वारकरी शिक्षण संस्था वारदोली व माऊली हरिपाठ मंडळ (नवघरपाडा) चालक ह.भ.प.लक्ष्मण महाराज बंडा त्या नंतर सायंकाळी ३ ते ४ वाजता संपूर्ण नवघर गावात दिंडी मिरवणूक काढण्यात आली असता संपूर्ण नवघर गावासह परिसर व भाविक जय जय राम कृष्ण हरि या नाम घोषाणे तल्लीन झालेले पाहावयास मिळाले. त्यानंतर दिपोत्सव सायंकाळी ६-०० ते ७-०० होऊन मान्यवारांचा सत्कार करण्यात आला. नंतर शिवचरित्र व्याख्याते ह.भ.प.श्री.अमित महाराज(बळवली पेण) यांचे सुश्राव्य किर्तनाचा कार्यक्रम पाड पडला तर रात्री १० नंतर जागर भजन जय शिव शंकर प्रासादिक भजन मंडळ (आवरे)बुवा-अनंतभगत(आवरे),पखवाज चैतन्य बंडा. त्यानंतर शनिवार दिनांक ०७/०३/२०२६ रोजी सकाळी ०८-०० ते १०-०० वाजता वारकरी शिक्षण संस्था वारदोली यांचे भजन होऊन सकाळी १०-०० ते १२-०० वाजता रामायणाचार्य ह.भ.प. श्री. संजय महाराज (वारदोली) यांचे सुश्राव्य असे काल्याचे कीर्तन व महाप्रसाद व्यवस्थापक श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी सांप्रदाय रायगड भुषण ह.भ.प.प्रभाकर महाराज यांच्या मार्गदर्शना खाली झाले असता या दोन्ही दिवशी नवघर गाव आणि परिसर भक्ती भावात न्हाऊन निघाले !!

# जालना जिल्ह्यात ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर’ अभिनव उपक्रमास सुरुवात

■ शेतकऱ्यांच्या प्रलंबित महसुली प्रकरणांवर तात्काळ कार्यवाही समस्या शिबिरस्थळीच निकाली काढा - आमदार बबनराव लोणीकर

■ परतूर तालुक्यातील आष्टी आणि मंठा तालुक्यातील वायाळ पांगरी येथून शिबिरास सुरुवात

■ आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभ हस्ते आणि प्रमुख उपस्थितीत आष्टी आणि गोसावी पांगरीत उदघाटन संपन्न




**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी. नामदेव मंडपे /मंठा जालना** : नागरिकांच्या महसुली व प्रशासकीय समस्या गावपातळीवरच सोडविण्यासाठी शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर’ या अभियानाची सुरुवात जालना जिल्ह्यात आज (दि.७ मार्च) करण्यात आली. या शिबिरांच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शासनाच्या विविध सेवा व योजनांचा लाभ पोहोचविण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे.

परतूर तालुक्यातील आष्टी मंडळातील खंडेश्वर मंदिर, आष्टी तसेच मंठा तालुक्यातील पांगरी गोसावी मंडळातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पांगरी गोसावी येथे आज शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही शिबिरांचे उद्घाटन भाजपा नेते, माजी मंत्री तथा परतूर–मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी उपस्थित हजारो नागरिकांना मार्गदर्शन करताना आमदार लोणीकर म्हणाले की, महसूल विभागासह विविध शासकीय विभागांच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा या शिबिरांचा मुख्य उद्देश आहे. नागरिकांच्या प्रलंबित महसुली प्रकरणांवर तात्काळ कार्यवाही करून शक्य तितक्या समस्या शिबिरस्थळीच निकाली काढाव्यात, असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

जमीन नोंदी, फेरफार, वारसा नोंद, उत्पन्न व जातीचे दाखले, तसेच विविध शासकीय योजनांबाबतची माहिती आणि लाभ यासंदर्भातील प्रश्नांचे निराकरण प्राधान्याने करण्यात यावे, असेही त्यांनी सांगितले. शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

दरम्यान, ग्रामपंचायत स्तरावर या शिबिरांची व्यापक प्रसिद्धी करून जास्तीत जास्त नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, यासाठी सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

शिबिरांदरम्यान ७/१२ अभिलेखावरील दुरुस्ती, प्रलंबित फेरफार, नोंद दुरुस्ती, लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत प्रमाणपत्रे, डिजिटल ७/१२, ई-मोजणी, ई-फेरफार, पीएम किसान, ॲग्री स्टॅक, तक्रार निवारण, भूसंपादन, अकृषिक जमिनीचे प्रकरणे, तुकडेबंदी, तसेच अकृषिक परवानगीसंदर्भातील नोंदी अद्ययावत करणे यासह विविध कामे करण्यात येणार असल्याचे यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या भाषणात नमूद केले.

तसेच प्रत्येक मंडळ मुख्यालयात एकखिडकी (सिंगल विंडो) प्रणाली स्थापन करून नागरिकांकडून प्राप्त अर्जांवर तत्काळ कार्यवाही करून त्याबाबत संबंधितांना कळविण्यात येणार आहे. भोगवटादार वर्ग-२ जमीन वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्यासाठी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा डाटाबेस तयार करण्याचेही निर्देश या वेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी आपल्या भाषणात दिले.

याशिवाय तालुक्यातील शाळांमधील पात्र विद्यार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यासाठी शाळास्तरावर अर्ज गोळा करून ते ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पूर्ण करण्यात येणार आहेत. तसेच सामाजिक अर्थसहाय्य योजनांतील पात्र लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करून शिबिरात मंजुरीचे आदेश वाटप करण्यात येणार आहेत.पाणंद रस्ते तसेच ‘सर्वांसाठी घरे’ योजनेअंतर्गत उर्वरित लाभार्थ्यांची यादी तयार करून शिबिरामध्ये पट्टे वाटप करण्याच्या दृष्टीनेही कार्यवाही करण्यात येणार असल्याचे आमदार बबनराव लोणीकर आपल्या भाषणात म्हणाले. याप्रसंगी मंठा तालुक्यातील वायाळ पांगरी येथे उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, मंठा तहसीलदार श्रीमती सुमन मोरे, उपविभागीय कृषी अधिकारी राम रोडगे, मंठा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गगनबोने, मंठा तहसीलचे नायब तहसीलदार कल्याण काळजात विकास राजपूत डीडी कुलकर्णी विष्णुपुरी, मंठा तालुका कृषी अधिकारी वाघमोडे, मंठा तालुका आरोग्य अधिकारी कुंडकर, मंठा तालुका भूमि अभिलेख अधिकारी पवार, भाजपा जालना तालुका अध्यक्ष विक्रम उफाड, मोहन आढे, महेश पवार, सरपंच परमेश्वर मानकर, वाईचे सरपंच सुनील ठाकरे, बिडी पवार, बाबुराव मास्तर, b बरबडा सरपंच प्रकाश हजारे यांच्यासह गावातील व परिसरातील हजारो महिला पुरुष शेतकरी शेतमजूर विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

तर् परतुर तालुक्यातील आष्टी येथे उपजिल्हाधिकारी मनीषा दांडगे, उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, परतूर तहसीलदार दामोदर जाधव, उपविभागीय कृषी अधिकारी राम रोडगे, परतुर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राजेश तांगडे, तालुका कृषी अधिकारी देवानंद सांगवे, भाजपा परतुर तालुका अध्यक्ष शत्रगुण कणसे, तुकाराम सोळंके, शहाजी राक्षे, बंकटनाना सोळंके, माणिकराव वाघमारे, सिद्धू केकान, गजानन लोणीकर, बाबाराव थोरात, अमोल जोशी, नसरुल्ला काकड, रमेश थोरात, सिताराम राठोड, निर्धास राठोड, सुधाकर जाधव, रमेश राठोड, कृष्णा टेकाळे, आष्टी चे ग्रामविकास अधिकारी डीबी काळे यांच्यासह आष्टी सर्कलमधील हजारो नागरिकांची यावेळी उपस्थिती होती.

---

## देशाच्या सामरिक शक्तीला नवी दिशा देण्यात सोलर समूहाचे मोलाचे योगदान - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**राकेश यादव /वाडी नागपूर** : जगातील संरक्षणाचे क्षेत्र झपाट्याने बदलत आहे. नवा वर्ल्ड ऑर्डर तयार होत असून व्यापाराचाही शस्त्र म्हणून वापर होत आहे. अशा काळात ज्या देशाजवळ सामरिक शक्ती आणि तंत्रज्ञान आहे, तोच देश भविष्यात आघाडीवर असेल. या दिशेने आपला देश झपाट्याने वाटचाल करत असताना देशाच्या सामरिक शक्तीला नवी दिशा देण्याचे कार्य सोलर समूह करत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

सोलर डिफेन्स अँड एरोस्पेसच्या वतीने मिहानच्या विशेष आर्थिक क्षेत्रात उभारण्यात येणाऱ्या रोबोटिक्स अँड युएव्ही फॅसिलिटी प्रकल्पाच्या भूमिपूजन समारंभात मुख्यमंत्री बोलत होते. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार चरणसिंग ठाकूर, सोलर डिफेन्स अँड एरोस्पेसचे अध्यक्ष सत्यनारायण नुवाल, व्यवस्थापकीय संचालक मनीष नुवाल, राघव नुवाल, हर्ष नुवाल आदी मान्यवर यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, एकेकाळी संरक्षण सामग्रीच्या उत्पादन क्षेत्रात कुठलीही स्पष्टता नसताना सोलर समूह या क्षेत्रात कार्य करीत राहिला. आज या समूहाने देशातील आघाडीच्या संरक्षण उत्पादन कंपन्यांमध्ये स्थान मिळवले आहे. अत्याधुनिक ड्रोन असो की पिनाका रॉकेटसारखे तंत्रज्ञान असो, देशाच्या सामरिक शक्तीला नवी दिशा देण्याचे कार्य या समूहाने केले आहे. बदलत्या जगात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान, सेमी कंडक्टर इकोसिस्टीम तसेच क्वांटम टेक्नॉलॉजी महत्त्वाची भूमिका बजावित आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने संरक्षण तंत्रज्ञान, एरोस्पेस आणि डीपटेक क्षेत्रासाठी नवे धोरण तयार केले. सोलरच्या माध्यमातून या धोरणांतर्गत झालेली ही सर्वात मोठी गुंतवणूक आहे, याकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष वेधले.

‘राष्ट्रप्रथम’ या विचारातून सोलर इंडस्ट्रीजची वाटचाल सुरु असताना राज्य शासनाकडून त्यांना संपूण सहकार्य मिळेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिली.

**सोलर इंडस्ट्रीचे योगदान अभिमानास्पद- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी**

जागतिक स्तरावर संरक्षण सिद्धतेच्या क्षेत्रात होत असलेल्या परिवर्तनाच्या पार्श्वभूमीवर आम्ही आमची संरक्षणसिद्धता वाढवित आहोत आणि विश्वशांतीसाठी ते अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी बोलताना केले.

रोबोटीक इंजिन आणि ड्रोनच्या क्षेत्रात मोठी प्रगती होत असून सध्या जगभरात सुरु असलेल्या संघर्षातून त्याची झलकही बघायला मिळत आहे. सोलरचा हा प्रकल्प देखील भविष्यातील तंत्रज्ञानाशी जुळलेला आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात खासगी क्षेत्राची क्षमता लक्षात घेता सरकार या क्षेत्राला प्रोत्साहन देत आहे, याकडे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी लक्ष वेधले.

या कार्यक्रमात रोबोटिक्स अँड युएव्ही फॅसिलिटी निर्मिती विषयीची माहिती देणारी ध्वनीचित्रफीत प्रदर्शित करण्यात आली. सोलर डिफेन्स अँड एरोस्पेसचे अध्यक्ष सत्यनारायण नुवाल यांनी यावेळी बोलताना समूहाच्या आजवरच्या वाटचालीची तसेच भविष्यातील ध्येय, धोरणांविषयीची भूमिका मांडली. राघव नुवाल यांनी आभार मानले. या कार्यक्रमास संरक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**रोबोटिक्स अँड युएव्ही फॅसिलिटीविषयी...**

सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेडकडून उभारल्या जाणाऱ्या या युनिटमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित मध्यम उंचीवर आणि लांब पल्ल्याचे उड्डाण करणारे ड्रोन, रोबोट, युएव्ही आणि विविध संरक्षण उपकरणांची निर्मिती केली जाणार आहे. कंपनी अत्याधुनिक तंत्रज्ञानासह पूर्णपणे स्वदेशी उत्पादनावर भर देणार आहे,

ज्यामुळे ‘मेक इन इंडिया’ आणि ‘आत्मनिर्भर भारत’ अभियानाला बळकटी मिळणार आहे. या प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होतील, असा अंदाज आहे. या प्रकल्पामुळे नागपूरची 'डिफेंस हब' म्हणून ओळख आणखी घट्ट होणार आहे.

---

## इंदापूर पंचायत समिती सभापतीपदाची तालुक्यात उत्सुकता शिगेला

### कु.ज्योस्त्ना सुरडकर यांना संधी मिळणार?

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : इंदापूर पंचायत समितीच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांनंतर सभापतीपद कोणाच्या वाट्याला जाणार याबाबत तालुक्यात चर्चेला उधाण आले आहे. यंदा सभापतीपद हे अनुसूचित जातीसाठी आरक्षित असून सणसर गणातून निवडून आलेल्या कु. ज्योस्त्ना सुरडकर यांचे नाव आघाडीवर असल्याची चर्चा आहे. कु. ज्योस्त्ना मोहन सुरडकर या उच्चशिक्षित असून मागील काळात त्यांच्या वडिलांच्या माध्यमातून गणातील अनेक विकासकामे यशस्वीरीत्या पार पडली आहेत. त्यामुळे स्थानिक जनतेत त्यांच्याबद्दल विश्वास निर्माण झाला आहे.याशिवाय त्या कृषीमंत्री दत्तात्रय भरणे व सणसर गावचे सरपंच यशवंत नरुटे पाटील यांचे एकनिष्ठ विश्वासू कार्यकर्ते मानले जात असल्याने त्यांना सभापतीपद मिळण्याची शक्यता अधिक असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.या चर्चेमुळे इंदापूर तालुक्यातील राजकारणाला नवे वळण मिळाले असून अंतिम निर्णयाची उत्सुकता सर्वत्र दिसून येत आहे.

---

## अपात्र उमेदवारांनी ९ मार्चपर्यंत हरकती नोंदवाव्यात

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी वाशिम /गजानन पवार पाटील** : जनगणना – २०२७ च्या कामकाजासाठी टेक्नीकल असिस्टंट पदावर कंत्राटी तत्वावर १८ महिन्यांच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्याकरिता इच्छुक उमेदवारांकडून २४ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा सेतू समिती, जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांच्यामार्फत अर्ज स्विकारण्यात आले होते. या प्रक्रियेनंतर अपात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.उमेदवारांना त्यांच्या अर्जाबाबत काही आक्षेप अथवा हरकत असल्यास ती लेखी स्वरूपात आवश्यक कागदपत्रांसह ९ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथील राज्यस्व सभागृहात स्वतः उपस्थित राहून सादर करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.निर्धारित वेळेनंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेप अथवा हरकती तसेच ई-मेल किंवा पोस्टाद्वारे प्राप्त होणाऱ्या हरकतींचा विचार करण्यात येणार नाही. याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी, असे जिल्हा सेतू समितीचे सदस्य सचिव तथा निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी कळविले आहे.

---

## सणसर सोसायटीच्या शॉपिंग कॉम्प्लेक्स व बँक ऑफिस इमारतीचे रविवारी भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : सणसर विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या मार्फत रविवार दि. ८ मार्च रोजी शॉपिंग कॉम्प्लेक्स व बँक ऑफिस इमारतीचे भूमिपूजन सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री इंदापूर तालुक्याचे आमदार दत्तात्रय भरणे व पुणे जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष दिगांबर दुर्गाडे यांच्या हस्ते भूमिपूजन होणार असल्याची माहिती सणसर विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन रमेश यशवंत निंबाळकर यांनी दिली. या नव्या इमारतीमुळे सणसर परिसरातील व्यापारी व ग्राहकांना आधुनिक सुविधा उपलब्ध होणार असून ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहारांना नवे बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.या भूमिपूजन सोहळयामुळे गावात उत्साहाचे वातावरण तयार झाले असून स्थानिक नागरिक व व्यापारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे दिसून येत आहे.




**सणसर सोसायटीचे मागील काळातील संचालक मंडळ यांनी वर्षा नु वर्षे बँकेच्या नवीन इमारत बांधकामासाठी मागणी होत होती.मी सणसर सोसायटीच्या चेअरमन पदाचा कार्यभार घेतल्यानंतर सहकार विभागाची लागणारी योग्य परवानगी घेण्याचे काम माझ्या कार्यकाळात झाले त्यामुळे आज असलेल्या भूमिपूजनाच्या कार्यक्रमाचा मला मनातून आनंद होत आहे.**

**मा.सुशिल निंबाळकर**
**माजी चेअरमन सणसर सोसायटी**

---

## 4 तास, 50 मिनिटांत पार केले 17 किमीचे अंतर ! जलतरण विश्वात 6 वर्षाच्या मानस पाटीलने रचला इतिहास

**दैनिक युवक आधार**

**उरण शहर प्रतिनिधी/ सायली साळुंखे** : उरण मधील 6 वर्षाच्या मानस जयेश पाटीलने आज एक पोहण्याच्या विश्वात एक नवा वइतिहास रचला आहे. उरण नागाव बीच ते जेएनपीए बंदर हे 17 कि.मी.सागरी अंतर केवळ पहिल्याच प्रयत्नात यशस्वीरित्या पार करून एक जागतिक विक्रम केला आहे. मानसने 4 तास,50 मिनिटांत हे अंतर पार केले, त्यमुळे तो "वर्ल्ड्स यंगेस्ट सी स्विमर टू कम्प्लीटए 17 किमी ओपन सी स्विम" हा विक्रम करण्यात यशस्वी झाला आहे.त्यामुळे संपूर्ण उरण तालुक्यांतून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




त्याच्या या प्रयत्नाला IEA बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सने अधिकृतपणे मान्यता दिली आहे. मानसच्या या विक्रमाने आम्हाला गर्व वाटतो. त्याने त्याच्या वयाच्या इतक्या लहान वयामध्ये त्यांनी जे काही साध्य केले आहे, ते खरोखरच प्रेरणादायक आहे," असे कौतुकास्पद उद्गार डॉ. संदीप सिंह, सीईओ, IEA बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स यांनी 6 वर्षीय मानस पाटील याचे जेएनपीए बंदरामध्ये स्वागत करताना काढले, तर यावेळी उपस्थित IEA बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सचे नॅशनल ज्यूरी हेमंत सिंग म्हणाले, "मानसच्या या विक्रमाने आम्हाला खूप आनंद झाला आहे. त्याने आमच्या अपेक्षां पेक्षा त्याने हे समुद्र मार्गावरील 17 किमी अंतर पहिल्याच प्रयत्नात आणि कमी वेळात अथकपणे पार केले आहे." उपस्थित IEA बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सचे प्रसिद्धी प्रमुख अरुण लाल, म्हणाले, "मानसच्या या विक्रमाने भारताच्या जलतरण जगतात एक नवीन अध्याय जोडला आहे. त्याच्या या प्रयत्नाने देशातील युवा जलतरणपटूंना प्रेरणा मिळेल, अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त करून कु. मानस पाटीलचे अभिनंदन केले. या प्रयत्नाला IEA बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सने अधिकृतपणे मान्यता दिली आहे .

त्याचे प्रशिक्षक मणिक पाटील, सुनील पाटील, आणि निरीक्षक सुनील मझेकर यांनीही त्याच्या प्रयत्नात महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचे सांगून मानस म्हणाला या विक्रमाने मला जागतिक स्तरावर प्रसिद्धी मिळवून दिली असली तरी या मझ्या यशात सिंहाचा वाटा माझ्या आई-बाबांचा आहे,मझ्या परिवाराचा आहे. त्याच्या भविष्यातील योजनांबद्दल बोलताना, मानस म्हणाला, "मला आणखी काही विक्रम करायचे आहेत आणि माझ्या देशाचे नाव उंचावायचे आहे." त्याच्या परिवाराने आणि प्रशिक्षकांनी त्याचे अभिनंदन केले आहे. इतक्या लहान वयात केलेल्या जागतिक विक्रमाने "मानसच्या आईच्या डोळयात आनंद अश्रू ओसंडत होते मानसच्या या विक्रमाने आम्हाला खूप आनंद झाला आहे. त्याने आमच्या अपेक्षां हे सागरी अंतर कमी वेळात ने पार केले आहे," असे मानसच्या आई आमच्या प्रतिनिधीला म्हणाल्या मानसच्या या विक्रमाने भारताच्या जलतरण जगतात एक नवीन अध्याय जोडला आहे. त्याच्या या प्रयत्नाने देशातील युवा जलतरणपटूंना प्रेरणा मिळेल,

# मागासवर्गीयांच्या अंत्यसंस्कारात आडकाठी आणणाऱ्यांची आता खैर नाही :- आमदार अमित गोरखे यांच्या तारांकित प्रश्नावर सरकारचे कडक कारवाईचे आदेश

**दैनिक युवक आधार**

**जाफ्राबाद तालुका प्रतिनिधी/ अशोक म्हस्के** : महाराष्ट्र हे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे पुरोगामी राज्य आहे, असे आपण अभिमानाने सांगतो. मात्र, आजही ग्रामीण भागात मागासवर्गीय समाजाच्या व्यक्तीला मरणोत्तर सन्मानाने निरोप मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो, ही बाब आपल्या लोकशाहीसाठी आणि माणुसकीसाठी अत्यंत क्लेशदायक आहे, अशा शब्दांत भाजपा आमदार श्री. अमित गोरखे यांनी विधान परिषदेत सरकारचे लक्ष वेधले. राज्यातील ग्रामीण भागामध्ये मागासवर्गीय समाजाच्या व्यक्तींवर सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यास होणारा विरोध हा माणुसकीला काळिमा फासणारा प्रकार असल्याचं आमदार अमित गोरखे यांनी म्हटलं आहे.

**तारांकित प्रश्नाद्वारे सरकारचे लक्ष वेधले**

पुरोगामी महाराष्ट्रात मरणानंतरही सन्मानाने निरोप मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागणे ही लोकशाहीसाठी क्लेशदायक बाब असून, अशा घटना घडल्यास संबंधित तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि पोलीस पाटलांना थेट जबाबदार धरून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी, अशी आग्रही मागणी भाजपा आमदार अमित गोरखे यांनी विधान परिषदेत केली. राज्यातील ग्रामीण भागामध्ये मागासवर्गीय समाजाच्या व्यक्तींवर सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यास होणाऱ्या विरोधाबाबत आमदार गोरखे यांनी तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी त्यांनी प्रशासकीय अनास्था आणि सामाजिक विषमतेवर प्रखर प्रहार केला.

**संविधानाने दिलेल्या समानतेच्या अधिकाराची पायमल्ली**

तारांकित प्रश्नाद्वारे सभागृहाचे लक्ष वेधताना आमदार अमित गोरखे म्हणाले



की, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या राज्यात आजही अनेक गावांमध्ये मागासवर्गीयांना सार्वजनिक स्मशानभूमीत प्रवेश नाकारला जातो. पावसाळ्यात गुडघाभर चिखलातून किंवा नदीपात्रात अंत्यसंस्कार करावे लागतात. हे रोखण्यासाठी 'ॲट्रॉसिटी' कायद्यांतर्गत कठोर कारवाई करून

**संविधानाने प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा आणि मरणानंतर सन्मानाने निरोप घेण्याचा अधिकार दिला आहे. ग्रामीण भागात आजही मागासवर्गीय समाजाच्या अंत्यविधीला होणारा विरोध हा अमानवीय अत्याचार आहे. ज्या गावात अंत्यसंस्कार रोखले जातील, तिथल्या जबाबदार अधिकाऱ्यांचे निलंबन व्हावे, ही माझी ठाम मागणी आहे. मरणोत्तर विटंबना थांबवण्यासाठी आणि दोषींना अजामीनपात्र कोठडी मिळवून देण्यासाठी माझा लढा सुरूच आहे.**

**- आमदार अमित गोरखे**

आरोपींना अजामीनपात्र अटक झालीच पाहिजे.

**आमदार गोरखे यांची भूमिका :**

१. प्रशासकीय जबाबदारी व निलंबन: ज्या गावांमध्ये स्मशानभूमीअभावी प्रेताची विटंबना होईल किंवा अंत्यसंस्कार रोखले जातील, त्या भागातील तहसीलदार, सरपंच, पोलीस पाटील आणि गटविकास अधिकारी (BDO) यांना थेट जबाबदार धरून त्यांच्यावर 'कर्तव्यात कसूर' केल्याप्रकरणी तात्काळ निलंबनाची कारवाई करावी.

२. अजामीनपात्र गुन्हे: अंत्यसंस्काराला विरोध करणे हा केवळ सामाजिक वाद नसून तो अमानवीय अत्याचार आहे. अशा घटनांत सहभागी असणाऱ्यांवर 'ॲट्रॉसिटी' (SC-ST Act) अंतर्गत तातडीने गुन्हे दाखल करून त्यांना अजामीनपात्र अटक करण्यात यावी.

३. राज्यस्तरीय हेल्पलाइन व टास्क फोर्स: अशा संवेदनशील घटनांची तक्रार करण्यासाठी सरकारने एक स्वतंत्र 'राज्यस्तरीय हेल्पलाइन' सुरू करावी. तक्रार प्राप्त होताच पुढील २ तासांच्या आत पोलीस संरक्षण देऊन अंत्यविधी सन्मानाने पार पाडण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर सोपवण्यात यावी.

**सामाजिक न्याय मंत्र्यांचे उत्तर**

आमदार अमित गोरखे यांच्या प्रश्नावर उत्तर देताना सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून, जिथे मागासवर्गीय समाजासाठी स्मशानभूमी नाही, तिथे गायरान जमिनीतून स्मशानभूमीसाठी जागा देण्याचा सरकारचा प्राधान्याने प्रयत्न राहील. यासाठी सामाजिक न्याय विभागाकडून आवश्यक निधी दिला जाईल. जे लोकप्रतिनिधी किंवा अधिकारी यामध्ये अडथळा निर्माण करतील, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले जातील. जिल्हा नियोजन समितीच्या (DPC) निधीबाबतही तसे निर्बंध घातले जातील. या चर्चेत आमदार अमोल मिटकरी, राजेश राठोड आणि जगन्नाथ अभ्यंकर यांनी देखील सहभाग नोंदवून या विषयाचे गांभीर्य अधोरेखित केले. सरकारकडे मागासवर्गीयांच्या हक्कासाठी आमदार अमित गोरखे यांनी मांडलेली ही परखड भूमिका सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे.

# मनमिळाऊ स्वभावाच्या पांडुरंग विठोबा कराळे यांचे अपघाती निधन

**दैनिक युवक आधार**

**अहिल्यानगर प्रतिनिधी :** आष्टी तालुक्यातील वेलतूरी येथील रहिवासी व सध्या अहिल्यानगर येथे वास्तव्यास असलेले पांडुरंग विठोबा कराळे यांचे अपघाती निधन शुक्रवार दिनांक ६ मार्च रोजी रात्री सुमारे अकरा वाजता झाले. त्यांच्या निधनाची बातमी समजताच नातेवाईक, मित्रपरिवार व परिचितांमध्ये शोककळा पसरली. त्यांचा अंत्यविधी शनिवार दिनांक ७ मार्च रोजी अहिल्यानगर येथील अमरधाम स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात पार पडला.

कै.पांडुरंग कराळे हे अत्यंत साध्या, सरळ व मनमिळाऊ स्वभावाचे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. स्पष्ट बोलणे हा त्यांचा स्वभाव असला तरी त्यांच्या मनात कोणाबद्दलही कटुता नसायची. त्यामुळे परिसरातील सर्वांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. प्रत्येकाशी आपुलकीने वागणे आणि मदतीची भावना ठेवणे ही त्यांची खास ओळख होती.

आयुष्याच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी रोजगाराच्या शोधात मुंबई गाठली. मुंबई येथे त्यांनी टेलर म्हणून शिलाई मशीनचे काम करत काही काळ उपजीविका केली. त्यानंतर ते आपल्या आई-वडिलांकडे वेलतूरी येथे परतले. येथे त्यांनी काही काळ पोस्टमन म्हणून काम पाहिले. पुढे ती नोकरी सोडून त्यांनी टेलरिंगचा व्यवसाय सुरू केला. याचबरोबर दुधाचा व्यवसायही त्यांनी केला. त्यामुळे वेलतूरी व आसपासच्या गावांमध्ये त्यांचा मोठा परिचय निर्माण झाला होता. त्यांच्या साधेपणामुळे आणि प्रामाणिक स्वभावामुळे ते अनेकांच्या विश्वासातील व्यक्ती बनले होते.

सुमारे तीस वर्षांपूर्वी ते अहिल्यानगर येथे वास्तव्यास गेले. येथेही त्यांनी विविध ठिकाणी काम करून आपल्या कुटुंबाचा सांभाळ केला. मेहनती स्वभाव, प्रामाणिकपणा आणि साधेपणा या गुणांमुळे त्यांनी आयुष्यभर कष्ट करून संसार उभा केला.



त्यांचा स्वभाव सर्वांना आपलंसं करणारा होता.

अंभोरा हे त्यांचे सासरवाडीचे गाव असून कै. शिवदास आमले यांची कन्या कुसुम या त्यांच्या पत्नी आहेत. त्यामुळे अंभोरा गावाशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते होते. या गावात त्यांचे नातलग व परिचित मोठ्या संख्येने आहेत. ते मूळचे सालेवडगावाशी संबंधित कुटुंबातील होते. त्यामुळे सालेवडगावे, वेलतूरी, अंभोरा आणि अहिल्यानगर या सर्व ठिकाणी त्यांचा मोठा परिचयाचा गोतावळा होता.

दरम्यान, बुधवारी सकाळी साडेसातच्या सुमारास मनमाड रोडवर पायी चालत असताना एका मोटारसायकलस्वाराने त्यांना जोराची धडक दिली. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली व मेंदूत रक्तस्त्राव झाला. त्यांच्यावर उपचार सुरू असताना ते तीन ते चार दिवस कोमात होते. अखेर शुक्रवार रात्री अकरा वाजता त्यांची प्राणज्योत मालवली.

कै.पांडुरंग कराळे यांच्या पश्चात पत्नी कुसुम कराळे, तीन मुले, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अचानक झालेल्या निधनाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून नातेवाईक व मित्रपरिवारातून हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या साध्या व मनमिळाऊ स्वभावाच्या आठवणी अनेकांच्या मनात कायम राहतील. त्यांच्या कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याची शक्ती ईश्वराने द्यावी, अशी भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.कै. पांडुरंग काळे यांचा दशक्रिया विधी 15 मार्च रोजी रविवारी अमरधामअहिल्यानगर येथे होणार आहे

# जागतिक महिला दिन : समानतेकडे एक ठाम पाऊल

दरवर्षी ८ मार्च रोजी आपण जागतिक महिला दिन साजरा करतो. हा दिवस केवळ स्त्रियांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी नसून, स्त्रियांच्या हक्कांसाठी आणि समानतेसाठी उभे राहण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. स्त्री म्हणजे माया, त्याग, कणखरपणा आणि प्रेम यांचे सुंदर मिश्रण. ती आई आहे, बहीण आहे, पत्नी आहे, मुलगी आहे. पण सर्वात आधी ती एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. तिच्या जन्माचे स्वागत हे केवळ कुटुंबाचे नव्हे तर संपूर्ण समाजाचे सौभाग्य आहे.म्हणूनच "मुलगी झाली हो!" हे वाक्य आनंदाने आणि अभिमानाने उच्चारले गेले पाहिजे. परंतु आजही समाजात मुलींच्या हक्कांवर गदा आणणाऱ्या अनेक अनिष्ट प्रथा, परंपरा समाजात दिसतात.आजच्या घडीला सुद्धा अनेक ठिकाणी मुलगी जन्माला आली की आनंदाऐवजी चिंता व्यक्त केली जाते. तिच्या शिक्षण, स्वावलंबनापेक्षा तिच्या लग्नाचा विचार केला जातो. आजही अनेक मुली शिक्षण घेण्याच्या वयात बालविवाहाच्या जाचातून जात आहेत. लहान वयात लग्न म्हणजे त्यांच्या स्वप्नांचा गळा घोटला जातो. खेळण्याचे, शिकण्याचे आणि मोठे होऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे वय असताना त्यांच्या खांद्यावर संसाराची जबाबदारी टाकली जाते. बालविवाहामुळे मुलीचे शिक्षण खंडित होते, आरोग्यावर परिणाम होतो, मुलींचा आत्मविश्वास कमी होतो तसेच कुपोषण, माता मृत्यू-बाल मृत्यू यांसारखे दुष्परिणाम बालविवाहामुळे दिसून येतात.



स्त्री आणि पुरुष हे समाजाचे दोन समान स्तंभ आहेत. एकाशिवाय दुसऱ्याचे अस्तित्व अपूर्ण आहे. तरीही अनेक ठिकाणी स्त्रियांना कमी लेखले जाते, त्यांच्या क्षमतांवर शंका घेतली जाते. पण इतिहास साक्षी आहे स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून उभ्या आहेत. मग घर असो, शिक्षण असो, विज्ञान, कला किंवा राजकारण स्त्रीने आपली ताकद सिद्ध केली आहे.स्त्री-पुरुष समानता ही केवळ कायद्यातील तरतूद नसून ती आपल्या विचारांमध्ये आणि वर्तनात उतरली पाहिजे. आपल्याला जर खरोखरच महिला दिन साजरा करायचा असेल, तर प्रत्येक मुलीच्या जन्माचे आनंदाने स्वागत केले पाहिजे, तिच्या लग्ना आधी तिच्या शिक्षणाला आणि स्वावलंबनाला प्राधान्य दिले पाहिजे असे केल्यास नक्कीच घरात प्रेमाची, संवेदनांची आणि संस्कारांची फुले उमलतील. मुलगी ही घराचा मान आणि देशाची शान असते. तिच्या जन्माचा सन्मान करणे हीच खरी प्रगती आहे.

मुलगा आणि मुलगी यांच्यात भेदभाव न करता समान संधी दिल्या, तरच समाज प्रगत होईल.आई, बहीण, पत्नी, मुलगी या नात्यांपलीकडेही स्त्री ही एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. तिचीही स्वप्ने आहेत, तिचीही मते आहेत, तिचेही ध्येय आहे.त्यासाठी तिच्या पंखांना बळ द्या, तिच्या आवाजाला साथ द्या. तेव्हाच खऱ्या अर्थाने स्त्री सक्षमीकरणाकडे खरी वाटचाल होईल.या महिला दिनी आपण सर्वांनी मिळून एक निश्चय करूया.

•प्रत्येक मुलीच्या जन्माचे स्वागत करूया.

•बालविवाहाला ठाम विरोध करूया.

•प्रत्येक मुलीच्या शिक्षणाला व स्वावलंबनाला प्राधान्य देऊया.

•स्त्री च्या स्वातंत्र्याचा सन्मान करूया.

•स्त्री-पुरुष समानतेचा विचार आपल्या घरापासून सुरू करूया.

कारण, स्त्री सशक्त झाली तर कुटुंब सशक्त होते, कुटुंब सशक्त झाले तर समाज सशक्त होतो, आणि समाज सशक्त झाला तरच राष्ट्राची प्रगती होते.महिला दिन हा केवळ उत्सव नाही, तर परिवर्तनाची सुरुवात आहे.चला तर मग या महिला दिनानिमित्त आपण स्त्रीशक्तीचा सन्मान करूया आणि समानतेवर आधारित, न्याय्य आणि प्रगत समाज घडवण्याचा संकल्प करूया.

**कु. मोनाली छाया शांताराम धुर्वे**

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती तर्फे आयोजित जागतिक महिला दिन

**दैनिक युवक आधार**

**नागपूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नागपूर तर्फे ८ मार्च २०२६ जागतिक महिला दिन आंबेडकर मिशन हॉल नवानकाशा , नागपूर येथे आयोजित करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नागपूर महिला विभागातर्फे कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.ह्याप्रसंगी डॉ. संगीता पांडे , कौटुंबिक समुपदेशक , कौटुंबिक न्यायालय , नागपूर ह्या प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष निवासी संपादक , बहुजन सौरभ प्रा. संध्या राजूरकर भूषविणार आहेत. राज्य कार्यकारिणी सदस्य विजया श्रीखंडे यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

कार्यक्रमाचे संचालन नियोजन प्रा. पुष्पा घोडके, वर्षा सहारे, मंगल गाणार, इंदू उमरे, माही मोहिले करणारआहेत.सकाळी ११ वाजता सुरू होणाऱ्या या कार्यक्रमानिमित्त दिवसभर विविध विषयांवर चर्चा, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती चे कार्य ह्यावर प्रश्नावली, कविता वाचन आणि गीत गायन , नृत्य आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. अशी माहिती प्रधान सचिव डॉ सुनिल भगत यांनी दिलेली आहे. याप्रसंगी रामभाऊ डोंगरे, चित्तरंजन चौरे, गौतम पाटील देवानंद बडगे, डॉ विकास होले, वसंत मोहिले, उमेश चिट्टे, अजय रहाटे, विजय सुरवाडे, प्रा. पुष्पा घोडके, वर्षा सहारे, शीला डोंगरे, देवयानी भगत, विजया.




ठाकरे,मंगला गाणार, सुषमा शेवडे, प्रीती नगरारे, सुषमा होले, इंदू उमरे, माही मोहिले, शोभा पाटील, चंदा मोटघरे, वर्षा टेंभेकर, गीता सुरवाडे, ज्योत्स्ना करवाडे आणि इतर मान्यवर मंडळी उपस्थित होती. तरी सर्व महिला मंडळी या कार्यक्रमासाठी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा.

# आवाज महामुंबईचा संपादक श्री मिलिंद खारपाटील यांचा वाढदिवस सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांनी साजरा

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर** : जेष्ठ पत्रकार ,आवाज महामुंबईचा चॅनेल चे संपादक तथा पत्रकार उत्कर्ष समितीचे रायगड जिल्हा अध्यक्ष श्री मिलिंद खारपाटील यांचा ५६ वा वाढदिवस पनवेल मध्ये ४ मार्च रोजी सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. आवाज महामुंबईचा चॅनेल चे वाटीनेवछत्रपती शिवाजी महाराज या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली होती. त्यामधील विजेते आणि सहभागी विद्यार्थ्यांना लिटिल आयडल स्कूल नवीन पनवेल येथे सन्मानपत्र आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.याचबरोबर पनवेल मधील सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अमरदिप बालविकास फाऊंडेशन या संस्थेला सन्मानित करण्यात आले. पनवेल महानगरपालिका हॉस्पिटल मधील डॉ रेहाना मुजावर यांनाही वैद्यकीय सेवेसाठी सन्मानित करण्यात आले. लिट्ल आयडल स्कूल ला देखील सन्मानित करण्यात आले.

यावेळी आदर्श शिक्षिका सौ शारदा खारपाटील, सिटीझन युनिटी फोरम चे राजकुमार ताकमोगे , महाराष्ट्र लोककल्याणकारी सेवा संस्थेचे एन डी




खान, होप मिरर फाउंडेशन खारघरचे फिरोज शेख, पर्यावरण व पर्यटन संरक्षण बहुउद्देशीय संस्था.चे संस्थापक अध्यक्ष श्री.गोविंद प्रजापती,आवाज महामुंबईचा चॅनेल चे पत्रकार संदेश पाटील, सचिन पास्टे, रंजिता मांडवकर ,लिट्ल आयडल स्कूल च्या प्रिन्सिपॉल सौ पूनम गुप्ता, चेअरमन मनोज गुप्ता ,स्कूल मधील शिक्षिका, विद्यार्थी आदी उपस्थित होते.यावेळी मिलिंद खारपाटील यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.मिलिंद खारपाटील हे गेली ३७ वर्ष पत्रकारितेत असून कृषिवल, उरण टाईम्स, किनारपट्टी, बुलंद आवाज, कोकणदीप,पुण्यनगरी, रामप्रहर, कर्नाळा, किल्ले रायगड,आवाज कोकणचा, आपले साम्राज्य या वृत्तपत्रात पत्रकार म्हणून काम केले आहे. श्रमजीवी मध्ये सहसंपादक , श्रमशक्ती मध्ये कार्यकारी संपादक म्हणून काम केले आहे.

मी २४ तास,शिवसत्ता मध्ये पत्रकार, महामुंबई 24 बाय 7 मध्ये संपादक आणि आवाज महामुंबईचा चॅनेल चे ते मालक आणि संपादक आहेत.त्यांच्या आवाज महामुंबईचा या चॅनेल चे १८ लाख viewers पूर्ण झाले आहेत.ते पत्रकार उत्कर्ष समिती चे रायगड जिल्हा अध्यक्ष आहेत.मानव विकास संघाचे उरण तालुकाध्यक्ष, आगरी सेना पत्रकार संघाचे उरण तालुका अध्यक्ष, आगरी समाज परिषद चे उरण तालुका सचिव आहेत. सहयोग स्नेह सेवा संस्थेचे सचिव,द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशन, महाराष्ट्र लोककल्याणकारी सेवा संस्था ,अमरदिप बालविकास फाऊंडेशन, चाईल्ड केअर संस्था यांचे ते सल्लागार आहेत. वाचाल तर वाचाल हा संदेश देऊन त्यांनी रायगड , रत्नागिरी, मुंबई जिल्ह्यातील वाचनालयांना आतापर्यंत पाच लाखाहून अधिक किमतीची पुस्तके भेट दिली आहेत.रक्ताची गरज ओळखून २६ वेळा रक्तदान केले आहे. २० हजार वृक्ष लागवडीमध्ये सक्रीय सहभाग घेतला आहे.आतापर्यंत त्यांनी १४६ किल्ले पाहिले असून पुढील चार वर्षात २०० किल्ले पूर्ण करण्याचा त्यांनी मानस व्यक्त केला. सेकंडरी स्कूल चिरनेर दहावी १९८५ ग्रुप चे ते ॲडमिन असून प्रत्येक सहलीत छत्रपती शिवाजी महाराज यांचा किमान एक किल्ला ते पाहतात.न्हावा शेवा आंतरराष्ट्रीय कंटेनर टर्मिनल कडून गुणवंत कामगार, द्रोणागिरीभूषण, रायगडभूषण, कोकणरत्न आदी पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.त्यांच्या वाढदिवसानिमित आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार मनोहर शेठ भोईर यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.त्यांना शुभेच्छा देण्यासाठी त्यांच्या महालक्ष्मी या निवासस्थानी सकाळ पासून रात्रीपर्यंत मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकरी आणि महिलांच्या सक्षमीकरणाला प्राधान्य देणारा अर्थसंकल्प : आमदार विनोद अग्रवाल

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड/गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस जी यांनी सादर केलेला महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प हा सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करणारा आणि विकासाला चालना देणारा आहे. या अर्थसंकल्पात सर्वप्रथम शेतकरी हिताला प्राधान्य देण्यात आले आहे. राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ₹2 लाखांपर्यंत कर्जमाफी जाहीर करण्यात आली असून वेळेत कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ₹50 हजार प्रोत्साहन रक्कम देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच कृषी पंपांना वीज अनुदान आणि विविध कृषी योजनांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळणार आहे. गोंदिया जिल्ह्यासारख्या कृषिप्रधान भागातील शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.

महिलांच्या सक्षमीकरणासाठीही या अर्थसंकल्पात विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. 'माझी लाडकी बहीण' योजनेअंतर्गत महिलांना दरमहा ₹1500 आर्थिक सहाय्य दिले जात असून हे अनुदान असेच सुरू राहणार आहे.

शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठीही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.



राज्यातील गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना अधिक व्यापक करण्यात आली आहे. तसेच ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह व शैक्षणिक सुविधा वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच आरोग्य क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठीही मोठ्या प्रमाणावर निधी देण्यात आला आहे.

ग्रामीण रुग्णालयांची क्षमता वाढवणे, नागरिकांना परवडणाऱ्या आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे आणि आरोग्य सुविधांचा विस्तार करणे हा सरकारचा स्पष्ट हेतू या अर्थसंकल्पातून दिसून येतो.

# शिक्षण क्षेत्रातील क्रांतीचा ध्यास; विनायकराव जाधव यांचा दर्जेदार शिक्षणाचा संकल्प!"

## दर्जेदार शिक्षणासाठी आम्ही कटीबद्ध

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/रणजीत ठाकूर** : सध्याच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळावे आणि त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा, यासाठी अश्विन शिक्षण संस्था संचलित स्व. माणिक पोदार लर्न स्कूल, पूर्णपणे कटीबद्ध असल्याची ग्वाही संस्थेच्या वतीने देण्यात आली आहे.

"इंग्रजी माध्यमाचे शिक्षण केवळ शहरापुरते मर्यादित न राहता, ते आपल्या भागातील प्रत्येक विद्यार्थ्याला मिळावे हा आमचा मुख्य उद्देश आहे. आम्ही केवळ पुस्तकी शिक्षण देत नाही, तर जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी लागणारा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करत आहोत."

आगामी शैक्षणिक वर्षापासून शाळेत कोडिंग, रोबोटिक्स, वक्तृत्व आणि व्यक्तिमत्व विकास यांसारख्या



आधुनिक विषयांवर विशेष भर दिला जाणार आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळावा, यासाठी नवनवीन उपक्रम शाळेच्या माध्यमातून राबविण्यात येणार आहेत.

**शाळेची प्रमुख वैशिष्ट्ये आणि आधुनिक सुविधा:**

अत्याधुनिक डिजिटल शिक्षण: ऑडिओ-व्हिज्युअल तंत्रज्ञानाचा वापर करून कठीण विषय सोपे करून शिकवले जातात.

**"शिक्षण हे परिवर्तनाचे सर्वात प्रभावी शस्त्र आहे. माझ्या भागातील एकही विद्यार्थी जागतिक दर्जाच्या शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी आम्ही सोयी-सुविधांमध्ये कोणतीही तडजोड करणार नाही. प्रत्येक विद्यार्थी हा उद्याचा यशस्वी नागरिक घडवणे हेच आमचे अंतिम ध्येय आहे."**
**विनायकराव जाधव, संचालक -स्व. माणिक पोदार लर्न स्कूल, वाढोणा.**

अनुभवी शिक्षकवृंद: तज्ज्ञ आणि उच्चशिक्षित शिक्षकांमार्फत गुणवत्तेची हमी.

कौशल्य विकास (Skill Development): वक्तृत्व, कला, क्रीडा आणि संगणक शिक्षणासाठी विशेष उपक्रम.

सुरक्षित वातावरण: संपूर्ण शालेय परिसर सीसीटीव्ही (CCTV) च्या निगराणीखाली असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची विशेष काळजी.

क्रीडा व शारीरिक विकास: भव्य क्रीडांगण आणि विविध खेळांच्या प्रशिक्षणाची सोय.

**पालकांचा विश्वास हीच आमची पावती**

अध्यक्षांनी पुढे नमूद केले की, पालकांनी आजवर संस्थेवर जो विश्वास दाखवला आहे, तोच आमच्या कार्याची खरी ऊर्जा आहे.

आगामी शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपूर्ण कोर्सेस आणि व्यक्तिमत्व विकास शिबिरे आयोजित करण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला. "आमच्या शाळेतून बाहेर पडणारा प्रत्येक विद्यार्थी हा केवळ सुशिक्षितच नव्हे, तर एक सुजाण आणि जबाबदार नागरिक असेल," असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# बागलाण तालुक्यात महसूल विभागा तर्फे आलियाबाद व ताहाराबाद येथे छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराला उत्साहात सुरवात ; पहिला टप्पात ४८० लाभार्थी

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी बागलाण-दीपक गायकवाड :** छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराचे शनिवारी अलियाबाद येथे सुरवात करण्यात आली. ताहाराबाद येथील बहुउद्देशीय महात्मा फुले मंगल कार्यालय येथे तर आलियाबाद मध्ये महादेव मंदिर डोम येथे आयोजन केलेले होते. या शिबिरास बागलांणचे आमदार दिलीप बोरसे तसेच बागलांणचे तहसीलदार कैलास चावडे, उपविभागीय अधिकारी महेश शेलार, भूमी अभिलेख उपाधीक्षक देवेन्द्र भावसार, निवासी नायब तहसिलदार सचिन मारके तसेच सटाणा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी सावंत व महसूल विभागाचे सर्व तलाठी मंडळ अधिकारी व कर्मचारी देखील उपस्थित होते. यावेळेस ताहाराबाद येथे २६२ व आलियाबाद येथे २१८ इतक्या नागरिकांना घरकुल वाटप, रेशनकार्ड, दाखले , जातींचे दाखले . नॉन – क्रीमीलेयर , सातबारा उतारे ,विविध नोंदी , विविध अर्थसहाय्य योजना ,शासकीय विहीर वाटप, निराधार गावातील सर्व शेतकऱ्यांना ,नागरिकांना विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांना देण्यात आला यात अनेक नागरिकांना पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थ्यांना चावीचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात दोन्हीही गावातील सरपंच, उपसरपंच जेष्ठ नागरिक पोलीस पाटील शाळा महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थिती नोंदवली. तसेच विविध योजना इत्यादी सर्व महसुली दाखल्यांचे अधिकाऱ्यांच्या समवेत वाटप करण्यात आलेत यावेळी ताहाराबाद व आलियाबाद परिसरातील शेतकरी, जेष्ठ नागरिक, अंध-अपंग यांना विविध शासकीय योजनेचा लाभ एकाच वेळी मिळाल्यामुळे सर्व नागरिकांच्या चेहरावर आंनद होता. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिराचे आयोजनामध्ये विविध शासकीय आणि योजनाची माहिती दिली. याप्रसंगी उपस्थित सर्वांनी शासकीय अधिकारी- कर्मचारी आणि शासनाचे आभार मानले.

**पहिल्या टप्प्यातील मुल्हेर आणि ताहाराबाद मंडळातील याशिबिरात आंनदाने सहभाग नोदविल्यामुळे शिबिर यशस्वी झाले असून आता पुढील टप्प्यातील विरगाव आणि डांगसौदाने येथील नियोजन देखील पूर्ण झालेले आहेत. सर्वांनी उर्वरित समाधान शिबिरात सहभाग नोदवावा.**

**- महेश शेलार**
**उपविभागीय अधिकारी बागलाण**

**बागलाण मधील या शिबिराचे टप्पापैकी पहिला टप्पा यशस्वी झालेला असून अजून तालुक्यात ५ टप्पे बाकी आहेत. तरी या टप्यात सर्व शासकीय योजेनेचा लाभ घेण्यासाठी सर्व नागरिकांनी आपल्या गावातील ग्राम महसूल अधिकारी अथवा मंडळ अधिकारी यांच्याकडे संपर्क किवा जाऊन नोदणी करावी.**

**- कैलास चावडे,**
**तहसीलदार बागलाण**

# 'झुडिओ' फ्रँचायझीच्या आमिषाने १४ लाखांचा गंडा ; ग्रामीण सायबर पोलिसांची मोठी कारवाई

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/छत्रपती संभाजीनगर:-** प्रसिद्ध 'झुडिओ' (Zudio) कंपनीची फ्रँचायझी देण्याच्या बहाण्याने सिल्लोड येथील एका व्यावसायिकाला तब्बल १३ लाख ९९ हजार ५०० रुपयांना लुटणाऱ्या आंतरराज्य टोळीचा छडा लावण्यात छत्रपती संभाजीनगर ग्रामीण सायबर पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणातील तांत्रिक तपासाद्वारे पोलिसांनी संशयितांच्या बँक खात्यातील ५ लाख ७७ हजार रुपयांची रक्कम गोठवून ती फिर्यादीला परत मिळवून दिली आहे.

**काय आहे प्रकरण?**

सिल्लोड येथील व्यावसायिक फिरोज खान बिसमिल्ला खान यांनी ऑगस्ट २०२४ मध्ये इंटरनेटवर 'झुडिओ' फ्रँचायझीसाठी शोध घेतला होता. यावेळी दोन संशयित व्यक्तींनी त्यांच्याशी संपर्क साधून स्वतःला कंपनीचे अधिकारी असल्याचे भासवले.



नोंदणी शुल्क, शोरूम बांधकाम आणि फर्निचरच्या नावाखाली संशयितांनी ऑगस्ट ते सप्टेंबर २०२४ दरम्यान वेळोवेळी एकूण १३,९९,५०० रुपये आरटीजीएसद्वारे (RTGS) उकळले. मात्र, शोरूमच्या साईट व्हिजिटसाठी टाळाटाळ होत असल्याने फिरोज खान यांनी मुंबईतील मुख्य कार्यालयात जाऊन चौकशी केली असता आपली फसवणूक झाल्याचे त्यांना समजले.

याप्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांच्याकडे तक्रार प्राप्त होताच सायबर पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. गुन्ह्यात वापरण्यात आलेली बँक खाती आणि मोबाईल क्रमांकांचे तांत्रिक विश्लेषण करून पोलिसांनी विविध राज्यांतील बँक खात्यांमधील ५ लाख ७७ हजार रुपयांचा निधी गोठवला. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून सदर रक्कम २५ फेब्रुवारी २०२६ रोजी फिर्यादीच्या खात्यात जमा करण्यात आली.

आपली कष्टाची रक्कम परत मिळाल्याने फिरोज खान यांनी सायबर पथकाचे विशेष आभार मानले आहेत.

ही मोहीम पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अन्नपूर्णा सिंह, पोलीस निरीक्षक संजय देशमुख, सपोनि निशा बनसोड, विजयसिंग जोनवाल, कैलास कामठे, संतोष तांदळे, दत्ता तरटे, योगेश मोईम, गणेश घोरपडे, मुकेश वाघ, राजेश राठोड, शीतल खंडागळे, सविता जायभाये, रूपाली जाधव, अनिता पारधे व नंदा तायडे यांनी फत्ते केली.

# ती च अस्तित्व; ८ मार्च-जागतिक महिला दिन..!

भारतात रोज कुठला न कुठला दिन साजरा केला जातो.अगदी त्याचप्रमाणे महिला दिन ही मोठया प्रमाणावर साजरा करतात.तो फक्त या दिवसापुरताच मर्यादित..! एरव्ही परत दुसऱ्या दिनाची आपण वाट पाहत असतो.हो न...? खरचं का इतके संकुचित झालोय आपण?महिलांचं महत्व काय फक्त एका दिवसापूरते सीमित आहे का?हे म्हणजे असे आहे-जसे शेतकरी बांधव बैलपोळा मोठ्या उत्साहात साजरा करतात. त्या दिवशी ते बैलांना सजवतात अगदी न काम करून घेता,त्याला पुरणपोळी खाऊ घालतात,त्याचे आभार मानतात आणि दुसऱ्या दिवसापासून परत त्यास कामास जुंपतात..!परत वर्षभरानंतरच त्याची पूजा व आभार.हे चक्र चालूच असते. माझे प्रामाणिक मत आहे की एक दिवसाचा विशेष दिन साजरा करायला काहीच हरकत नाही पण एरव्ही ही त्यांचे महत्व,त्यांचे आभार व्यक्त करायला काय हरकत आहे..!

**उत्सवाचा स्रोत**
**महिला दिन उत्सव**
**म्हणून न राहता,**
**उत्सवाचा स्रोत व्हावा..!**
**साजरा करायचे म्हणून**
**न करता,**
**स्त्रियांचे वर्षभर महत्व**
**वाटावे समाजाला...!!**

**महिला दिनाची पार्श्वभूमी**

जागतिक ८ मार्च १९०८ रोजी न्यूयॉर्कमध्ये वस्त्रोद्योगातील हजारो स्त्री-कामगारांनी रुटगर्स चौकात जमून प्रचंड मोठी ऐतिहासिक निदर्शने केली. दहा तासांचा दिवस आणि कामाच्या जागी सुरक्षितता ह्या मागण्या केल्या. या दोन मागण्यांबरोबरच लिंग, वर्ण, मालमत्ता आणि शैक्षणिक पार्श्वभूमीनिरपेक्ष सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांना मतदानाचा हक्क मिळावा अशी मागणीही जोरकसपणे केली. अमेरिकन कामगार स्त्रियांच्या या व्यापक कृतीने क्लारा झेटकिन अतिशय प्रभावित झाली. १९१० साली कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत, ८ मार्च १९०८ रोजी अमेरिकेतील स्त्री-कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ, ८ मार्च हा `जागतिक महिला-दिन' म्हणून स्वीकारावा असा जो ठराव क्लाराने मांडला, तो पास झाला. यानंतर युरोप, अमेरिका वगैरे देशात सार्वत्रिक मतदानाच्या हक्कासाठी मोहिमा उघडल्या गेल्या. त्यांचा परिणाम म्हणून १९१८ साली इंग्लंडमध्ये व १९१९ साली अमेरिकेत या मागण्यांना यश मिळाले.

भारतात मुंबई येथे पहिला ८ मार्च हा महिला दिवस १९४३ साली साजरा झाला. १९७१ सालच्या ८ मार्चला पुण्यात एक मोठा मोर्चा काढण्यात आला होता. पुढे १९७५ हे वर्ष युनोने `जागतिक महिला वर्ष' म्हणून जाहीर केले. त्यानंतर स्त्रियांच्या समस्या ठळकपणे समाजासमोर येत गेल्या. स्त्रियांच्या संघटनांना बळकटी आली. बदलत्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीनुसार काही प्रश्नांचे स्वरूप बदलत गेले तशा स्त्री संघटनांच्या मागण्याही बदलत गेल्या. आता बँका, कार्यालयांमधूनही ८ मार्च साजरा व्हायला लागला आहे. आजच्या काळात जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा करताना दिसून येतो. .

१९७५ या जागतिक महिला वर्षाच्या निमित्ताने संयुक्त राष्ट्र संघटनेने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याचे ठरविले. १९७७ साली संयुक्त राष्ट्र संघटनेच्या समितीने विविध सदस्यांना आमंत्रित करून ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय स्तरावर महिलांचे अधिकार आणि जागतिक शांतता या हेतून साजरा करवा यासाठी आवाहन केले.

**स्त्री चे नानाविध रूपे**

सर्व साहित्यिकांचीही माफी मागून इतकेच सांगावेसे वाटते आपण स्त्री चे वेगवेगळे पैलू प्रकर्षाने कधी मांडलेच नाहीत.

(ठराविक अपवाद असतीलही पण प्रकर्षाने नाही)स्त्री म्हटलं की आई/मातृ या रूपालाच सगळीकडे महत्व दिले गेले ते रूप महत्वाचे आहेच यात कोणाचं दुमत नसणार पण स्त्री च्या इतर रुपांच काय??

**स्त्री**
**ती आई आहे**
**ती ताई आहे**
**ती मैत्रीण आहे**
**ती पत्नी आहे**
**ती मुलगी आहे**
**ती जन्म आहे**
**तीच सुरवात आहे**
**आणि**
**सुरवात नसेल तर**
**बाकी सारे व्यर्थ आहे...!!**

अशा नानाविध रुपात ती असते.त्या सर्वांचे महत्व आहेच न ते ही आपण मान्य करायला हवे,विशद करायला हवे.आई विषयी आपल्याला जितके महत्व वाटते ना तितकेच महत्व इतर रूपाविषयी वाटेल त्या दिवशी स्त्री खऱ्या अर्थाने सुरक्षित असेल.विश्वातील अनेक देशांपैकी स्वतःची वेगळी अशी सांस्कृतिक ओळख असणारा आपला हा भारत देश..!ज्या देशात स्त्री ला देवी सम मानणारा येथील रहिवासी या देशातील अनेक क्षेत्रात स्त्रियांनी आपले महत्त्व दाखवून दिले आहे.अनेक शिखरे पादाक्रांत केली आहेत.तरीही तळपती समशेर बनून आजकाल ती आपल्या शत्रूंशी लढत आहे. हे शत्रू किती आहेत याची गिनती करणे सोपे आहे, पण ते कोण आहेत हे ओळखणे अवघड आहे. जगातल्या सर्वात सुरक्षित जागेत म्हणजे आईच्या पोटात ती जन्म घेते.आजकाल तिच्या गळ्यालाच नख लावण्याचे दुष्टकार्य केले जाते तेही 'जन्मदात' आईबापाच्या संमतीने आणि आजी-आजोबा, आत्या, मामा यांच्या साक्षीने. कदाचित आईच्या मनाविरूद्ध ते घडत असेल. आपल्या मातृप्रेमाच, वात्सल्याच्याही चिंधड्या उडवल्या जाताना तिला पाहावे लागत असेल यापेक्षा तिच्या नशिबी वाईट गोष्ट काय असेल. यांतून जरी एखादी स्त्री वाचलीच तर पुढेपण तिच्यासमोर संकटांचा पर्वतच पर्वत असतोच न.

**पुरुषांनी बदलावे**
**वासनेपोटी वा शरीरसुखासाठी**
**हल्ली ती दररोज मरत आहे,**
**कधी अत्याचार कधी जिवंतपणी**
**तिला जाळलं जातं आहे..!**
**तिचं ही स्वतःच अस्तित्व**
**तसंच स्वतःच मत आहे,**
**पुरुषांनाच आता ना**
**ऐकण्याची गरज दिसत आहे...!!**

**स्त्रियांचे शत्रू**

स्त्रियांचा सर्वात मोठा शत्रू म्हणजे पुरूषी मानसिकता. जाहिरातीतले तिचे प्रदर्शन असो वा चित्रपट नगरी असो वा समाजात वावरताना ती भूषवत असणारी पदे असो ती नेहमीच पुरुषांना भावेल अशी रेखाटली जाते. अगदी शिक्षण घेत असताना देखील पुरुषी मानसिकतेची सरंजाम शाही तिच्यावर वर्चस्व गाजवण्याची एकही संधी सोडत नसते. नोकरी करत असतानाही हीच परिस्थिती कायम असते.लग्नानंतर देखील तिच्याच नशिबात संकटे असतात. अशा अनेक शत्रूंना रिचवत, पचवत 'ती' तिची लढाई लढत असते. ती खरे तर भारतीय समाज व्यवस्थेचा मूलभूत कणा आहे. तो कणा टिकला तरच ही समाजव्यवस्था टिकून राहील हे सर्वांनी लक्षात ठेवायला हवे. जर तिच्यावर अन्याय करणाऱ्या नवऱ्याचा हात तिने थांबवला वा मुलींशी बेताल वर्तन करणाऱ्या आपल्या मुलाच्या श्रीमुखात भडकावली तर हे अराजक चित्र बदलण्यास वेळ लागणार नाही. निसर्गाने तर तिला 'प्रेम' नावाची विलक्षण देणगी दिली आहे. ते तिचे शस्त्रच आहे. या शस्त्राने ती अनेक अवघड कार्य सहजरित्या पार पाडत असते. तिच्या शब्दात मंत्राचे सामर्थ्य आहे. या मंत्राने ती अग्नी फुलवूही शकते व विझवूही शकते. त्या मंत्राचा ती कसा उपयोग करते, यावर समाजाचे अस्तित्व अवलंबून आहे. महिलांचे मग त्या कोणत्याही रुपात का असेनात त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे हा विचार समाजात रूजायला आणखी किती दिवस लागतील, हे सांगता येणे कठीण आहे. पण कुठेतरी ही पुरुषी मानसिकता थांबायला हवी अन स्त्री-पुरुष समानतेचे बीजे रुजायला हवीत.

**लेक वाचवा**
**तिच्या अस्तित्वामुळेच संपूर्ण**
**विश्व अखंडपणे चालत आहे,**
**ती आहे म्हणून तर ममतेचे**
**नाते नित्यपणाने बहरत आहे...!**
**टिकले जर स्त्रियांचे अस्तित्व**
**अबाधित असेल इतर सर्वांचे,**
**म्हणून 'लेक वाचवा'करु संकल्प**
**औचित्य साधत महिला दिनाचे.!!**

स्त्रियांचा आदर केला गेला पाहिजे,त्यांचे अस्तित्व मान्य करायला हवे याच त्यांच्यासाठी शुभेच्छा असतील.तमाम महिलांच्या 'अर्ध्या आभाळा'तला श्रद्धेचा, विश्वासाचा सूर्य कधीच न मावळो हीच या जागतिक महिला दिनानिमित्त तिला शुभेच्छा!!



**संकलक/लेखक**
**प्रा.सोमीनाथ खंडागळे**
**मो.९६५७२८४४४४**
**पाटोदा (बीड)**